cmyk

## संपादकीय

### भारतापेक्षा अमेरिकाच अडकेल स्वतःच्या चक्रव्युव्हात

महात्मा गांधींनी देशवासीयांना स्वदेशी वस्तू वापरण्याचा आणि खेड्याकडे चलण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचीच री ओढली आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना आपले आर्थिक हित जोपासण्याचे आवाहन केले आहे. आपले शेतकरी, लघु उद्योजक, तरुणांचा रोजगार आणि या सर्वांचे हित सरकारसाठी सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे नागरिकांनी भारतीयांच्या काबाडकष्टातून तयार झालेल्या वस्तूच खरेदी कराव्यात असे आवाहन पंतप्रधानांनी केले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१०१ | मंगळवार, दि.५ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

नवी दिल्ली–झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक शिबू सोरेन यांचे निधन झाले आहे. शिबू सोरेन यांच्या निधनाची बातमी कळताच मोदींनी त्यांना सोशल मीडियावरून श्रद्धांजली अर्पण केली. शिबू यांचे सोमवारी सर गंगाराम रुग्णालयात निधन झाले. पंतप्रधानांनी रुग्णालयात जाऊन शिबू यांच्या पार्थिवाला श्रद्धांजली वाहिली आणि त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. यानंतर पंतप्रधान मोदी यांनी शिबू सोरेन यांचे पुत्र आणि मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची भेट घेतली आणि शोक व्यक्त केला.

## थोडक्यात...

### एनडीए संसदीय पक्षाची आज बैठक

नवी दिल्ली–एनडीए संसदीय पक्षाची बैठक दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वा. होणार आहे. पंतप्रधान मोदी त्यात भाषण करतील. पावसाळी अधिवेशनातील ही पहिलीच बैठक असेल ज्यामध्ये एनडीएचे सर्व खासदार उपस्थित राहतील. यामध्ये ऑपरेशन सिंदूरसाठी पंतप्रधान मोदींचा सत्कार केला जाईल.

### मनोज जरांगे आजपासून चार दिवस दौऱ्यावर

जालना–मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा सलग चार दिवस दौरा असणार असून ते धाराशिव, सोलापूर, हैदराबाद, लातूर या ठिकाणी भेट देणार आहेत. दिनांक ५ ऑगस्ट रोजी सकाळी १० पासून धाराशिव येथे दिवसभर गाठी भेटी, दिनांक ६ रोजी सकाळी १० वाजता सोलापूर येथे दिवसभर गाठी भेटी, सात ऑगस्ट रोजी जरांगे पाटील यांचा तेलंगणा दौरा असणार आहे.

### राज ठाकरे–बच्चू कडू यांची होणार भेट

मुंबई–मनसे प्रमुख राज ठाकरे आणि प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यात सहा ऑगस्टला होणार भेट होणार आहे. बच्चू कडूंच्या आगामी आंदोलना संदर्भात राज ठाकरे आणि बच्चू कडू यांच्यात भेट होणार असल्याचे समजते.

### रामेश्वर धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

पाटोदा–महाराष्ट्रातील बीड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ श्री क्षेत्र रामेश्वर सौताडा येथे एक दुःखद घटना घडली आहे. बहादुरपूर येथील शंकर कोळेकर (वय–२५) या तरुणाचा रामेश्वर धबधब्यात बुडून मृत्यू झाला. तो आपल्या मित्रांसोबत देवदर्शनासाठी गेला होता. देवदर्शन झाल्यानंतर सर्व मित्र धबधब्याच्या डोहात पोहण्यासाठी गेले. त्यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात बुडून शंकरचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# चिंता वाढली; ऑगस्टमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस

## दमदार पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा

**पुणे । प्रतिनिधी**

**यंदा जून, जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे टेन्शन वाढले होते. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात तरी चांगला पाऊस होईल, या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशा येण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिन्यात सुध्दा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.**



भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तविली असून नैऋत्य मान्सून हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीसाठी वेधशाळेने पावसाचा अंदाज जाहीर केला आहे. जून ▶▶ पान २ वर

### सप्टेंबरमध्ये दमदार पाऊस

ऑगस्टमध्ये कमी पाऊस असल्याचा अंदाज वर्तवला असला तरी सप्टेंबर महिन्यात मात्र महाराष्ट्रात दमदार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यातील सुरुवातीचे तीन महिने रिकामे राहीले असले तरी सप्टेंबर महिन्यातील पाऊस शेतकऱ्यांसाठी समाधानकारक असण्याची शक्यता आहे.

## मंत्री भुजबळ बंगल्याच्या प्रतीक्षेत

### माजीमंत्री मुंडें याना ४२ लाखांचा दंड

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी कृषी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी राजीनामा देऊन काही महिने उलटले आहेत. तरी त्यांनी मलबार हिल येथील सातपुडा हा शासकीय बंगला अद्याप सोडलेला नाही. त्यामुळे त्यांना आतापर्यंत तब्बल ४२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर दुसरीकडे महायुतीमधील मंत्री छगन भुजबळ या बंगल्याच्या प्रतीक्षेत आहेत.यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी मुदत मागितली होती.

महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यावर धनंजय मुंडे यांना सातपुडा बंगला वाटप करण्यात आला होता. मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत सरकारी बंगला रिकामा करणे बंधनकारक असते. धनंजय मुंडे यांनी ४ मार्च रोजी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यानुसार त्यांनी २० मार्चपर्यंत बंगला सोडणे अपेक्षित होते. पण त्यांनी मुदतवाढ मागून अद्याप बंगला रिकामा ▶▶ पान २ वर

## धनंजय मुंडे यांच्याकडून डोंगरतुकाई परिसरातील कामांची पाहणी

### भाविकांच्या सोयीसह पौराणिक महत्त्व जपण्याच्या सूचना



**परळी वै. । प्रतिनिधी**

**परळी शहरात श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून डोंगर तुकाई परिसरात सध्या सुरू असलेल्या आंबा आरोग्य भवानी मंदिर तसेच श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ येथील विविध विकास कामांची माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या समवेत पाहणी केली.**

डोंगर तुकाई येथील श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ हे दत्तगुरूंचे अवतार असलेल्या नृसिंह सरस्वती यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले असून त्याचा उल्लेख गुरुचरित्रात सुद्धा आढळतो. गुहे सारखे असणारे हे शक्ती स्थळ व त्यावरील अंबा आरोग्य भवानी मंदिर या ठिकाणी भाविकांची, साधकांची योग्य सुविधा व्हावी त्याच बरोबर या स्थळाचे ▶▶ पान २ वर

# ओबीसी आरक्षणासह होणार महापालिका निवडणुका

## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय सर्व याचिका फेटाळल्या

नवी दिल्ली/मुंबई । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाने नव्या प्रभाग (वॉर्ड) रचनेला आणि ओबीसी आरक्षणाला आव्हान देणा–या सर्व याचिका फेटाळून लावत, निवडणुकांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार आणि २७ टक्के ओबीसी आरक्षणासह होणार आहे.



नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणा–या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. काही स्थानिक घटकांनी नव्या रचनेतील बदलांवर आक्षेप घेतले होते. मात्र, आज न्यायालयाने या याचिका फेटाळत राज्य सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे मुंबई, पुणे, पिंपरी–चिंचवड, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये नव्या प्रभाग बांधणीच्या आधारे निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याचिकेत ११ मार्च २०२२ पूर्वीच्या वॉर्ड रचनेनुसार निवडणूक घेण्याची मागणी ▶▶ पान २ वर

### एसआयडीकडून घटनास्थळाचा स्पॉट पंचनामा

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथे घडलेल्या महादेव मुंडे हत्या प्रकरणाच्या तपासाला वेग आला आहे. एसआयटी पथकाकडून घटनास्थळाचा स्पॉट पंचनामा करण्यात आला आहे. सध्या एसआयटी बीड जिल्ह्यात तळ ठोकून असून महादेव मुंडे यांची हत्या झाली त्या ठिकाणी एसआयटी प्रमुख पंकज कुमावत हे सोमवारी ▶▶ पान २ वर

### मनोज जरांगे पाटील यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांनी घेतली सदिच्छा भेट



बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीजवळील अंकुश नगर येथे सोमवारी (दि.४) सदिच्छा भेट घेतली.

बीडमध्ये दोन दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांची एका कार्यक्रमात भेट झाली होती. त्यानंतर डॉ.क्षीरसागर यांनी सहकाऱ्यांसोबत निवांत सदिच्छा भेट घेतली. यावेळी सामाजिक, राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली. संवाद साधत असताना त्यांचा सकारात्मक मिळालेला प्रतिसाद






## श्रावण सोमवार निमित्त पंकजाताई मुंडेंनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

**परळी वै.। प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. श्रावण महिन्यातील आज दुसरा सोमवार होता, यानिमित्ताने ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी प्रभू वैद्यनाथ मंदिरात जाऊन विधीवत पूजा, अभिषेक करून दर्शन घेतले. मंदिरात आल्यानंतर देवल कमिटीच्या वतीने राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

**तपोनुष्ठानाला भेट**

शिरूर अनंतपाळ मठ संस्थानचे श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे श्रावण मासानिमित्त वैद्यनाथ



# जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प -जिल्हाधिकारी

### सात ऑगस्टला होणार तीस लाख वृक्ष लागवड करून इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये येत्या वर्षभरात एक कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प असून येत्या सात आगस्ट रोजी पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत खंडेश्वरी मैदान बीड येथे एकाच दिवशी जिल्हाभरात तीस लाख वृक्ष लागवड करण्याचा संकल्प शुभारंभ होणार आहे. या अभियानात जिल्ह्यातील नागरिकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे









## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १४.५० क्विंटल | २,६५० | २,७५१ | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड : २४.५० क्विंटल | २,३३१ | ३,१०० | २,५१४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १३.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९६.५० क्विंटल | १,९०० | २,७१६ | २,५३३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ४.५० क्विंटल | ४,१०० | ४,६११ | ४,३५५ |
| हरभरा: ११.५० क्विंटल | ४,९०० | ७,७१० | ६,३४५ |

cmyk

## अग्रलेख

# भारतापेक्षा अमेरिकाच अडकेल स्वत:च्या चक्रव्युव्हात

महात्मा गांधींनी देशवासीयांना स्वदेशी वस्तू वापरण्याचा आणि खेड्याकडे चलण्याचे आवाहन केले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांचीच री ओढली आहे. अमेरिकेसोबत सुरू असलेल्या टॅरिफ वादाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना आपले आर्थिक हित जोपासण्याचे आवाहन केले आहे. आपले शेतकरी, लघु उद्योजक, तरुणांचा रोजगार आणि या सर्वांचे हित सरकारसाठी सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे नागरिकांनी भारतीयांच्या काबाडकष्टातून तयार झालेल्या वस्तूच खरेदी कराव्यात असे आवाहन पंतप्रधानांनी केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतेच भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था 'मृत' असल्याचे म्हटले होते. भारत रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याबद्दल ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर आणि दंडाची घोषणा केली आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी वाराणसी येथे बोलताना देशवासीयांनी नवीन वस्तू घेताना स्वदेशी मालाला पसंती द्यावी असे आवाहन केले. डोनाल्ड ट्रम्प यांना अप्रत्यक्ष प्रत्युत्तर देताना पंतप्रधान म्हणाले, भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या तयारीत आहे. भारताने आपल्या आर्थिक हितसंबंधांबाबत जागरूक राहायला हवे, तसेच स्वदेशी उत्पादनांवर भर देत पुढे गेले पाहिजे. ज्या वस्तू तयार करण्यासाठी आपल्या देशवासीयांनी घाम गाळला आहे, अशा वस्तू स्वदेशी आहेत. आपण 'मेक इन इंडिया' वस्तूच खरेदी केल्या पाहिजेत. आपले सरकार देशाच्या विकासासाठी जे काही शक्य आहे ते करत आहे. ज्यांना देशाचा विकास करायचा आहे.

भारताला जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था म्हणून पहायचे आहे, त्यांनी आपले मतभेद बाजूला ठेवून स्वदेशी वस्तूंसाठी आग्रही राहिले पाहिजे. यासाठी कोणताही राजकीय पक्ष, राजकीय नेता असो त्यांनी मतभेद बाजूला ठेवून स्वदेशीचा संकल्प केला पाहिजे असेही पंतप्रधान म्हणाले. जागतिक पातळीवर अस्थिरतेचे वातावरण आहे. सारे देश त्यांच्या वैयक्तिक हितसंबंधावर लक्ष देत आहेत. त्यामुळे भारतालाही आपल्या आर्थिक हितसंबंधाबाबत अधिक सतर्क राहावे लागेल. जागतिक पातळीवर अनिश्चितता असताना व्यापाऱ्यांनी केवळ स्थानिक वस्तूंची विक्री करण्याची शपथ घ्यावी. ग्राहकांनी खरेदी करताना ते देशातच उत्पादित झाले आहे काय, याचा जरूर विचार करावा असे सांगत पंतप्रधानांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापरावर भर दिला. देश स्वतंत्र झाला तेव्हा भारतीयांची 'मेड इन इंग्लंड', 'मेड इन जापान', 'मेड इन यूएसए' वस्तूंना पसंती असायची. कारण या वस्तू टिकाऊ, मजबूत आणि त्यांचा दर्जा उत्तम असायचा. त्यानंतर हळूहळू प्रत्येक क्षेत्रात भारताने प्रगती साधण्यास सुरुवात केली आणि भारतीय वस्तूही जागतिक दर्जाच्या बनू लागल्या हा इतिहास आहे. ट्रम्प यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला 'मृत अर्थव्यवस्था' असे संबोधले होते. तसेच भारतीय मालावर २५ टक्के टॅरिफ लावल्याची घोषणा करून रशियन युद्धसामग्री व तेल वापरल्यास दंडाची घोषणा केली होती. त्यावर पंतप्रधानांनी पहिल्यांदाच भाष्य केले.

अमेरिकेच्या दबावामुळे भारताने रशियाकडून तेलखरेदी बंद केल्याचा दावा केला जात होता परंतु 'एएनआय'च्या वृत्तानुसार भारताने रशियाच्या तेल रिफायनरीकडून खरेदी सुरूच ठेवली आहे. ट्रम्पसाठी हा निर्णय धक्कादायक मानला जात आहे. खरे पाहता जागतिक व्यापाराचा निर्णय हा किंमत, कच्च्या तेलाची गुणवत्ता, साठवण आणि इतर आर्थिक घटकांवर आधारित घेतला जातो. रशिया जगातील दुसरा मोठा कच्च्या तेलाचा उत्पादक देश आहे. रशिया दिवसाला ९.५ मिलियन बॅरल तेलाचे उत्पादन करतो. तसेच तो जगातील दुसरा सर्वाधिक तेल निर्यात करणारा देश आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क (टॅरिफ) धोरणामुळे जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. अनेक देशांवर त्यांनी हे निर्बंध लागू केले आहेत, मात्र असा निर्णय घेऊन त्यांनी स्वत:च्याच पायावर धोंडा मारून घेतला आहे. याचे परिणाम अमेरिकन जनतेला भोगावे लागणार आहेत. टॅरिफ निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणताही मोठा परिणाम होणार नाही. पण अमेरिकेची अर्थव्यवस्था मात्र धोक्यात येऊ शकते. एसबीआयच्या एका अहवालानुसार ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफचा फटका भारतापेक्षा अमेरिकेलाच जास्त बसू शकतो. ट्रम्प यांनी 'अमेरिका फर्स्ट' धोरणांतर्गत टॅरिफचा वापर करून अनेक देशांना व्यापारी करार करण्यास भाग पाडले. आतापर्यंत त्यांनी ३३ देशांशी अशा प्रकारे व्यापारी करार केले आहेत पण भारत या सापळ्यात अडकला नाही. भारतासारखी मोठी बाजारपेठ सोडणे अमेरिकेला महागात पडू शकते. भारत जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. २०३० पर्यंत त्याची ग्राहक बाजारपेठ ४६ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे.

अमेरिकन कंपन्यांचे मोठे वापरकर्ते भारतात आहेत. टॅरिफमुळे या कंपन्यांचे नुकसान होऊ शकते. अमेरिकन अर्थव्यवस्था आधीच महागाई, मंदावलेली जीडीपी वाढ आणि मंदीचा सामना करत आहे. ट्रम्प यांनी भारतावर दबाव आणण्यासाठी टॅरिफचा वापर केला, मात्र त्याचा सर्वाधिक फटका त्यांच्याच देशाला बसण्याची शक्यता आहे.

## पिंपरखेड जामा मस्जिद प्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करा- सय्यद सलीम बापू



**बीड । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्यातील मौजे पिंपरखेड येथील नोंदणीकृत जामा मस्जिद पाडून त्याची मालमत्ता विकल्याप्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तारिक–ए–इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी दिला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरखेड येथील जामा मस्जिद ही महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या राजपत्रात नोंदणीकृत एकमेव धार्मिक संपत्ती आहे. मात्र गावातील शेख महमूद शेख गफूर, शेख जाफर शेख गफूर, शेख पाशा शेख गफूर आणि शेख लील शेख गफूर या चौघा भावांनी काही वर्षांपूर्वी ही मस्जिद पाडून, तिचे लाकूड, माती व जागा विकल्याचा गंभीर आरोप आहे. या प्रकरणी मस्जिद खिदमत बहाल यांच्या तक्रारीवरून जिल्हा वक्फ अधिकारी व महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी २०१५ पासून पोलीस ठाणे वडवणीला वारंवार पत्रव्यवहार करून दोषींवर कायदेशीर कारवाईची शिफारस केली. २१ जानेवारी २०१५, १३ ऑक्टोबर २०२० आणि २३ फेब्रुवारी २०२४ रोजी अशा तीन प्रमुख पत्रांची नोंद असूनही आजपर्यंत कुठलीही ठोस कारवाई झालेली नाही. सलीम बापू यांनी सांगितले की, ''गुंड प्रवृत्तीचे हे लोक आता मस्जिदच्या मालकी हक्काच्या संपत्तीवर बेकायदेशीर कब्जा करण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रशासनाने त्वरित गुन्हे दाखल करून कारवाई करावी, अन्यथा जिल्हास्तरीय लोकशाही आंदोलन उभारले जाईल.''

## मेहनतीनेच यशाचे शिखर सर्वोच्च गाठता येते–प्रा.ईश्वर मुंडे




**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**सध्याच्या डिजिटल युगात स्पर्धा परीक्षेने विद्यार्थी यशस्वी होतो मेहनतीनेच यशाचे सर्वोच्च शिखर गाठता येते असे प्रतिपादन तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सत्कार सोहळ्याप्रसंगी ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.ईश्वर मुंडे यांनी केले.**

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते धारूर तालुक्याच्य शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एमटीएसइ प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. तब्बल ६ विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत आले आहेत त्यांचा सत्कार समारंभ गुणगौरव सोहळा आज विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार मुंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ईश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा .ईश्वर मुंडे उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थी साक्षी भीमा विटेकर, अमृता ज्ञानेश्वर सिरसट, साक्षी रामेश्वर सिरसट, अमृता भगवान घुगे, साक्षी श्रीकृष्ण गिराम, मधुरा हनुमंत मुंडे, वैष्णवी पंढरी चाटे हे विद्यार्थी एमटीएसइच्या परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत आले आहेत तर विशाल तात्याराव गडदे हा विद्यार्थी आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत शिष्यवृत्तीधारक ठरला आहे विद्यालयातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आम्ही उत्तीर्ण झाल्याचे मत सत्कार प्रसंगी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. त्याबद्दल सर्वांचा सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व शैक्षणिक फाईल देऊन पालका समवेत करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक महादेव केदार यांनी केले प्रस्ताविक आदर्श शिक्षक नाथा ढगे यांनी केले. यावेळी मार्गदर्शक शिक्षक हनुमंत काळे यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी विद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यार्थ्यांच्या या यशा बद्दल पालकांनी देखील त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.



## हिंगणी हवेली येथे शेतकरी मेळावा उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के एस के (काकू) कृषी महाविद्यालय बीड येथील हिंगणी हवेली येथे शेतकरी मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून पोखराअंतर्गत योजना यावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देण्यात आले, फळबाग लागवड व्यवस्थापन कसे करावे याची माहिती देण्यात आली. त्यामुळे कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले आधुनिक शेती पद्धती नवीन तंत्रज्ञान आणि सरकारी योजना ची माहिती या माध्यमातून शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यात आली. या कार्यक्रमासाठी कृषी सेवक नम्रता थोरात तसेच गावातील सरपंच व इतर शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सहसचिव डॉ,जी, व्ही साळुंखे प्राचार्य एस, पी,मोरे डॉ, एस, जी माने प्रा, एल,एम, बोंद्रे, डॉ, पी, बी मांजरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कृषी दुतानी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

# प्रगल्भ विचारांचे माजी आ.भीमराव धोंडेसाहेब



**आष्टी– पाटोदा–शिरूर मतदार संघाचे माजी आ.भीमराव धोंडे साहेब हे शेतकऱ्यांचे खंबीर नेते आहेत. धोंडेसाहेबांनी राजकारण नेहमी तत्वांचे व विचारांचे केले म्हणूनच ५० वर्षे त्यांचे राजकारण सत्तेत असो वा नसो ते कायम टिकून आहेत.आपल्या नम्र,शांत व संयमी वागण्यामुळे लोकांचे मन नेहमीच त्यांनी जिंकले म्हणूनच लोकांनीही जिंकलेल्या मनाचे त्यांच्या मतात परिवर्तन करून प्रत्येक निवडणुकीत धोंडेसाहेबांना मोठया संख्येने मतदान दिले. राजकारणाचा हेतु कायम विधायक कामासाठी ठेवल्यामुळे मतदार संघाचा विकास व जनतेचे कल्याण या दोन बाबीकडे त्यांनी जास्ती लक्ष दिले. निवडणुकातील जय पराजयचा त्यांनी कधी विचार केला नाही निरंतर जनसेवेचे आपले काम त्यांनी सुरुच ठेवले आहे.**

निवडणुकीत मत मिळवण्यासाठी तरुणांना आर्थिक आमिषे दाखवून व्यसनाच्या आहारी जाण्याला त्यांनी कायम विरोध केला त्यामुळे कदाचित त्यांचे राजकीय नुकसान ही झाले असेल.धोंडेसाहेब स्वतः एक कबड्डी व कुस्तीचे उत्कृष्ठ खेळाडू आहेत त्यामुळे शरीर स्वास्थ्य व त्यासाठी करावयाचा व्यायाम याची त्यांना उत्तम जाण आहे.आजही या वयात ते मैदानात रोज न चुकता तरुणांना ही लाजवेल अशा प्रकारचे व्यायाम प्रकार करतात.एका विधान सभेच्या निवडणुकीत धोंडेसाहेबांचा पराभव झाला परंतु दुसऱ्याच दिवशी सकाळी धोंडेसाहेब व्यायामासाठी मैदानात हजर होते. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांनाच ते शारीरिक स्वास्थ्य व त्यासाठी व्यायामाचे महत्व याची माहिती देताना नेहमीच दिसतात.खेळाडूंना प्रोत्साहन व प्रसंगी आर्थिक मदतही करतात.मतदार संघातील जनतेच्या विविध मागण्यांसाठी सर्वाधिक पायी मोर्चे काढणारे धोंडेसाहेब हे एकमेव नेते आहेत.ज्यांनी आष्टीच्या तहसीलपासून दिल्लीच्या संसदेपर्यंत पायी मोर्चे काढले आहेत.बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात धोंडेसाहेबांची संस्था नंबर एकवर आहे. बीड जिल्ह्यातील विध्यार्थ्यांची इथेच शिकण्याची सोय व्हावी म्हणून बरेच शैक्षणिक व व्यावसायिक कोर्सेस त्यांनी मतदार संघात सुरु केलेले आहेत.बऱ्याच गावात प्राथमिक व माध्यमिक शाळा त्यांनी सुरू केल्या आहेत.आज त्यांच्या शिक्षण संस्थेत अठरापगड जातीचे हजारो कर्मचारी विविध पदावर काम करतात.आपला कौटुंबिक उदरनिर्वाह चालवतात धोंडेसाहेबांमुळे अनेक लोकांना रोजगाराची संधी यामार्फत उपलब्ध झाली आहे.सर्व कर्मचारी वर्ग मतदार संघात राहायला असल्यामुळे आष्टी शहरातील व्यापारी बाजारपेठाही मोठ्या झाल्या आहेत. त्यांच्या शिक्षण संस्थेतील एखादा विद्यार्थी जर केंद्रीय स्पर्धा परीक्षेत (युपीएससी) पास झाला तर धोंडेसाहेबांनी त्याला ५ लक्ष रुपये बक्षीस संस्थेच्यावतीने घोषित केले आहे.

धोंडेसाहेबांचा जन्म एका शेतकरी कुटुंबातला म्हणून त्यांना शेती व शेतकरी या दोन्हीची विशेष आवड आहे त्यामुळेच त्यांनी त्यांच्या संस्थेचे नाव ही शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ असे ठेवले आहे.त्यांना शेतीत नवनवीन प्रयोग करायला आवडते,शेती उत्पादना संबंधीत नवीन माहिती घेणे त्याचा अभ्यास करून त्याचा जमेल तसा प्रचार करणे ही त्यांची आवड आहे.

त्यांच्या संस्थेच्या कृषी महाविद्यालयाचा परिसर तर एखाद्या विद्यापीठ परिसरापेक्षा कमी नाही.धोंडेसाहेब नेहमी विविध भागांतील व्यवसायिक प्रकल्पांना भेटी देतात त्यातून नवीन काहीतरी समजून घेण्याचा, शिकण्याचा प्रयत्न करतात.काही वर्षापासुन आष्टी शहरात कृषी प्रदर्शन आयोजित करुन त्यांनी शेतकऱ्यांना खुले दालन उपलब्ध करुन दिलेले आहे. व्यवसाय उद्योगाला चालना देण्यासाठी त्यांनी महेश मल्टीस्टेट या पतसंस्थामार्फत बँकिंग क्षेत्रात यशस्वी पदार्पण केले आहे. धोंडेसाहेब यांच्या सत्तेच्या कारकिर्दीत मतदार संघात सर्वाधिक गावे डांबरी रस्त्याने जोडण्याचे कामे झालेली आहेत म्हणूनच त्यांना ' रस्तेमहर्षी '' म्हणूनही म्हटले जाते.मतदार संघात एखादी नैसर्गिक आपत्ती आली तर आपल्यावतीने त्यांना काय मदत करता येईल यासंबंधी नेहमी त्यांचा प्रयत्न असतो.कोरोना संकट काळात हजारो गरजूंना किराणा वाटप केले.तीनही तालुक्यातील सरकारी कोविड सेंटरवर रुग्णांसाठी सलग १०० दिवस अन्नछत्र चालवले. धोंडेसाहेबांना वारकरी सांप्रदायाचे आकर्षण आहे.सर्व विषयांच्या वाचनाची आवड त्यांना असल्यामुळे संप्रदायीक वाचन ही त्यांचे होते पंढरपूर आषाढी वारीनिमित्ताने मोठे अन्नदान वारकऱ्यांसाठी प्रत्येक वर्षी ते करतात.आष्टी येथील मुर्शदपूर भागात ज्ञानेश्वर महाराज चाकरवाडीकर माऊली यांच्या मंदिरासाठी त्यांनी कोट्यावधी रुपयांची जमीन माऊली ट्रस्टला दान दिली आहे.त्यावर भव्यदिव्य असे माऊली मंदिर आज उभे आहे. लोकनेते भीमराव धोंडे यांना लोक ' साहेब '' म्हणतात, त्यांच्या व्यक्तिमत्वात ते साहेबपण दिसते ही परंतु सर्वांसाठीच साहेब असलेले धोंडेसाहेब सगळ्यांच्या सुख दुखातही सामील होतात हेच त्यांचे वेगळेपण ठरते. कुठल्याही पक्ष,नेता, कार्यकर्त्यांप्रती कसलीही कटुता ते मनात ठेवत नाहीत. चुकीचे घडले ते सोडून देऊन पुढे जाण्याची मानसिकता त्यांची असते. धोंडेसाहेबांनी आपल्या पुरोगामी विचारांशी कधी तडजोड केली नाही. राजकीय पार्श्वभूमी नसताना धोंडेसाहेबांनी स्वकर्तुत्वाने निर्माण केलेल्या या ' भीमशक्तीला '' सोडून या आष्टी विधानसभा मतदार संघाचेच नव्हेतर बीड जिल्ह्याचे राजकारण होणार नाही कारण त्यासाठी त्यांनी घेतलेले अपार कष्ट आणि तळागाळापासून जोडलेली विविध जातीधर्मांची असंख्य माणसं जी कायम त्यांच्या बरोबरच असतात. अशा या लोकनेता असलेल्या भीमराव धोंडेसाहेब यांचा जन्मदिवस आज ५ ऑगस्टला विविध उपक्रम राबवुन साजरा होतो आहे. धोंडेसाहेबांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

**प्रा.महेश चौरे, आष्टी.**

## पान १ वरून...

### मंत्री भुजबळ बंगल्याच्या प्रतीक्षेत

केलेला नाही.'सातपुडा' बंगल्याचे क्षेत्रफळ ४ हजार ६६७ चौ. फूट आहे. नियमांनुसार, मंत्र्यांनी १५ दिवसांत बंगला सोडला नाही, तर त्यांना प्रति चौ. फूट २०० रुपये दंड आकारला जातो. यामुळे, मुंडे यांना महिन्याला ९ लाख ३३ हजार रुपये दंड लागत असून, आता ही रक्कम ४२ लाखांच्या घरात पोहोचली आहे.त्यातच दुसरीकडे २० मे रोजी छगन भुजबळ यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांना सातपुडा बंगला देण्याचा शासकीय आदेश २३ मे रोजी काढण्यात आला. पण अद्याप धनंजय मुंडे यांना बंगला रिकामी करण्याची कोणतीही नोटीस पाठवण्यात आलेली नाही. यावर सामान्य प्रशासन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग एकमेकांकडे बोट दाखवत आहेत.

**मुदतवाढ मागितली : मुंडे**

याबद्दल धनंजय मुंडे यांनी नुकतंच प्रतिक्रिया दिली आहे. आजारपणामुळे मला मुंबईत राहणे आवश्यक आहे. माझ्या मुलीच्या शाळेचाही प्रश्न आहे. त्यामुळे निवासस्थान रिक्त करण्यासाठी मी मुदतवाढ मागितली आहे. याआधी अनेक माजी मंत्र्यांना अशा प्रकारे मुदतवाढ देण्यात आली आहे असे धनंजय मुंडे म्हणाले.

--------------

### चिंता वाढली; ऑगस्टमध्ये

आणि जुलै महिन्यात कमी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट आहे. पिके अजूनही चांगल्या स्थितीत नसून काही भागात तरी मागच्या १० ते १५ दिवसापुर्वी पेरणी झाली आहे. आता ऑगस्ट महिन्याचा पावसाचा अंदाज वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या नव्या अंदाजानुसार मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने शनिवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार राज्यात मान्सूनची अवस्था सध्या कमजोर झाली आहे. पुढील दोन आठवडे तरी राज्यात अशीच स्थिती कायम राहणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मान्सून ट्रफ आपल्या सामान्य स्थानापेक्षा अधिक उत्तरेकडे सरकरल्याने मध्य भारत आणि महाराष्ट्रात पावसाचा जोर ओसरला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी होऊ शकते, तर दुसरीकडे दक्षिण भारतात मात्र जोरदार पावसाची शक्यता आहे. याबाबत बोलताना आयएमडीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की मान्सुन ट्रफ ऊत्तरेकडे सरकण्यचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सध्या ते हिमालयाच्या पायथ्याशी सक्रिय आहेत, त्यामुळे सध्या उत्तरेकडील मैदानी प्रदेशात आणि पूर्वोत्तर राज्यात चांगला पाऊस पडत आहे. मात्र दुसरीकडे मध्य प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रात मान्सून ठप्प झाला आहे. सहा ऑगस्टनंतर दक्षिण भारतात पुन्हा एकदा पाऊस सक्रिय होऊ शकतो. आयएमडीच्या नैऋत्य मान्सून हंगामाच्या दुसऱ्या सहामाहीत आणि मासिक पाऊस आणि तापमानाचा अंदाज या दीर्घकालीन अंदाजानुसार ऑगस्ट –सप्टेंबर या कालावधीत संपूर्ण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आयएमडीने दिलेल्या संभाव्य अंदाज नकाशांनुसार सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये महाराष्ट्रात कमी पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे शेतकऱ्यांची चिंता वाढणार आहे. त्यातही मराठवाड्यातील काही जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली गेली असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

------------------

### ओबीसी आरक्षणासह होणार

करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली असून सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका देखील सुप्रीम कोर्टाने आज फेटाळून लावली. या याचिकेच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, आमच्या ६ मे २०२५ च्या आदेशानुसार २७% ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका घेण्यात येतील. तसेच वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार आहे. राज्य विधिमंडळाने तसा कायदा केला आहे आणि या कायद्याला स्थगिती नसल्याने हा पूर्णपणे अधिकार राज्य सरकारचा आहे असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

-------------

### महादेव मुंडे हत्या प्रकरणात

पोहोचले होते. घटनास्थळाची पाहणी अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. एसआयटीने घटनास्थळाचा स्पॉट पंचनामा केल्याने महादेव मुंडे यांच्या खुनाचा तपास वेगाने होण्याची शक्यता आहे.

-------------

### धनंजय मुंडे यांच्याकडून डोंगरतुकाइ

पौराणिक महत्त्व अबाधित राखून, दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण केली जावीत, अशा सूचना श्री मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकारी यांना केल्या. त्याचबरोबर या कामासाठी निधीची अडचण भासू देणार नाही, असेही त्यांनी आश्वस्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, सुरेश अण्णा टाक, राजेंद्र सोनी, नितीन मामा कुलकर्णी, जालिंदर नाईकवाडे, शंकर कापसे, आर्किटेक्ट श्री बांगड, नगर अभियंता श्री बेंडले, जाफर खान, श्री ढवळे यांसह अधिकारी – पदाधिकारी आदी उपस्थित होते.

-------------

### मनोज जरांगे पाटील यांची डॉ.योगेश

हा पुढील वाटचालीसाठी नवऊर्जा देणारा आहे, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले. याप्रसंगी संपादक गंगाधर काळकुटे, सरपंच अमोल बागलाने, देविदास जाधव हे उपस्थित होते.

----------

### श्रावण सोमवार निमित्त पंकजाताई

ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्री २१ दिवसीय मौन तपोनुष्ठान सुरू आहे. बेलवाडीतील गुरूलिंग स्वामी मंदिरात जाऊन या तपोनुष्ठानला ना. पंकजाताईंनी भेट देऊन महाराजांचे आशीर्वाद घेतले. यावेळी वीरशैव समाजाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजपच्या मंडळ शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, सुरेखा मेनकुदळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

---------

### जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवडीचा

मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, जिल्हा वनाधिकारी गरकळ, निवासी उपजिल्हाधिकारी आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की बीड जिल्ह्यामध्ये एक कोटी वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला असून त्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील वनविभाग दहा लाख, सामाजिक वनीकरण पाच लाख, जिल्हा परिषद पाच लाख, तुती लागवड तीन लाख, कृषी विभाग दोन लाख, नगरपालिका दीड लाख, वन्यजीव विभाग ७५००० ,पोलीस विभाग पन्नास हजार, इको बटालियन ५०,००० आणि इतर यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून एक लाख ७५ हजार अशी तीस लाख वृक्ष लागवड येत्या सात ऑगस्टला करण्यात येणार आहे. यामध्ये वड, पिंपळ, कडुलिंब, आंबा , शिशु ,करंज, शेवगा, जास्वंद, आदी प्रकारच्या झाडांचा समावेश असणार आहे. या वृक्ष लागवडीसाठी क्यु आर कोड, जिओ टॅगिंग ,वन विभागाकडून ड्रोनच्या च्या साह्याने छायाचित्रण आदी यंत्रणाचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी १२००० हुनअधिक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यात आले असून या कामी जिल्हा परिषद ते ग्रामपंचायत स्तरावर नियोजन करण्यात आले आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पत्रकार परिषद बोलताना सांगितले.

**ऊसतोड कामगारांचा मेळावा होणार**

याच वेळी पुढे बोलताना त्यांनी ऊसतोड कामगाराचा मेळावा येत्या सात ऑगस्टला पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलावर घेण्यात येणार असून यावेळी ऊसतोड कामगारांची आरोग्य तपासणी ही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण मंडळ पुणे या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती पुस्तकाचे प्रकाशन यावेळी करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत होणाऱ्या मेळाव्यात कामगार महिलांसाठी प्रथम उपचार संच पेटीचे वाटप करण्यात येणार आहे .ऊस तोंड कामगारांसाठी आरोग्य विभागामार्फत आरोग्य साथी उपक्रम सुरू करून त्या अंतर्गत १००० महिलांची आरोग्य साथी म्हणून निवड करण्यात येणार आहे. या महिला ऊसतोड कामगारांमधूनच असतील त्यांना आरोग्य संस्था बीड येथे प्रशिक्षण देणे, माहिती पुस्तिका पुरवणे, प्रथमोपचार संच पुरवणे ,ते हाताळण्याचे प्रशिक्षण देणे आदी कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. ऊसतोड कामगारांना प्रत्यक्ष स्थलांतरादरम्यान येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी टोल फ्री क्रमांक नव्याने सुरू करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्व कामगारांची शंभर टक्के नोंदणी करून ग्रामपंचायत स्तरावर ओळखपत्र विचारीत करणे ,ऊसतोड कामगारांना शासकीय योजनेचा लाभ मिळवण्यासाठी त्याचा फायदा होईल. नोंदणी झालेल्या सर्व ऊसतोड कामगारांना आयुष्यमान कार्ड, रेशन कार्ड ,घरकुल योजना, महसूल विभागातील योजना ग्रामविकास विभागातील योजना व इतर विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सर्व शासकीय योजनांचा लाभ शाच्युरेशन पद्धतीने या मार्फत करून देण्यात येणार असल्याची माहिती ही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिली. या पत्रकार परिषदेला मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान जिल्हा वन अधिकारी गरकळ आदींची उपस्थिती होती.

-----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५
३

# शैक्षणिकसह राजकारणातील महर्षी-मा.आ.भीमराव धोंडे



शिक्षण महर्षी माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी उभा केलेल्या आनंद चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून आष्टी शहरांमध्ये गंगाई नगरात उभा केलेला कॉलेज कॅम्पस यामुळे आष्टी शहराच्या मार्केटला मोठे वैभव प्राप्त झाले आहे. राजकारण, शैक्षणिक, समाजकारण यासह कृषीविषयक योगदानामुळे माजी आमदार आणि शिक्षण महर्षी भीमराव धोंडे यांच्या कार्याची छाप संपुर्ण बीड जिल्ह्यावर आहे.

शांत व संयमी स्वभाव असल्याने तरुणपणापासून माजी आमदार भीमराव धोंडे आष्टी -पाटोदा -शिरुर मतदार संघात लोकप्रिय झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची मोठी सोय व्हावी यासाठी त्यांनी ग्रामीण भागात चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण केले. त्यातून अनेक तरुणांना रोजगार मिळाला असून आजघडीला त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेऊन असंख्य विद्यार्थी मोठे अधिकारी बनले आहेत. आनंद चार टेबल च्या माध्यमातून आष्टी शहरांमध्ये बी ए एम एस आयुर्वेदिक महेश कॉलेज, राजश्री शाहू कृषी महाविद्यालय, डिप्लोमा इन इंजीनियरिंग, डी फार्म, बी. फार्म एम फॉर्म, अन्न तंत्र महाविद्यालय, नर्सिंग, डेरी डिप्लोमा, याचबरोबर आष्टी शहरांमध्ये दोन महाविद्यालय तर संपूर्ण मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर प्राथमिक व माध्यमिक शाळा असे शिक्षणाचे मोठे जाळे निर्माण करणारे भीमरावज धोंडे हे एक शिक्षण महर्षी ठरले आहेत.

शैक्षणिक योगदानाबरोबरच भीमराव धोंडे यांनी राजकारणात वेगळा ठसा उमठवला असून आमदारकीची हॅट्रिक करणारे व वीस वर्षांनी पुन्हा एकदा आमदारकी मिळवणारे ते मराठवाड्यातील बहुतेक एकमेव असावेत. आष्टी मतदार संघावर आजही त्यांची मजबुत पकड असून ओबीसी समाजासह इतर सर्वच समाजात त्यांना मानणारे लोक असून कोणतीही निवडणुक असली तरी धोंडे साहेबांना विचारात घेतल्याशिवाय निर्णय होत नाही. त्यामुळे राजकारणातही त्यांचे आजही अनन्य साधारण महत्व आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला असला तरी निराश न होता त्यांनी पुन्हा जोमाने काम सुरु केले असून दररोज सकाळी उठल्यावर व्यायाम, योगासन करुन स्वत:च्या शरीराला सुध्दा ते न्याय देण्याचे काम करीत आहेत. वय झाले तरी अजूनही ते विचाराने तरुण असल्याने मतदार संघातील तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात त्यांच्या सोबत आहे. पुन्हा नव्या जोमाने, नव्या दमाने ते कामाला लागले असून शैक्षणिक, सामाजिक, कृषीविषयक या क्षेत्रासह राजकारणातही येणाऱ्या काळात मोठे योगदान देण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे सज्ज आहेत. अशा या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाला वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

**-शरद रेडेकर, आष्टी**

# पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूल जप्त, एका आरोपीला अटक

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळनेर पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्याला अटक केली आहे. किशोर रामभाऊ माटे (वय ३७, रा. लोणी, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि.०४.०८.२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पिंपळनेर ते लोणी फाटा रस्त्यावर ओमकार हॉटेलसमोर एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सपोनि घुगे यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण पो शी पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांच्यासोबत दोन



पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली.

हॉटेल ओमकारसमोर संशयित व्यक्ती उभा असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला पाठीमागील बाजूस एक अर्धवट गंजलेले लोखंडी गावठी पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. जप्त केलेल्या गावठी पिस्तूलाचे अंदाजित मूल्य ४०,०००/- रुपये आहे. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करून पिस्तूल जप्त केले आहे. आरोपीने बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल बाळगून लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम २२३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण, पो शि पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांनी केली आहे.

# अभिजित जोंधळे, श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्काराने सन्मानित



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील अनुराग पुस्तकालयाचे अभिजित जोंधळे यांना छत्रपतीनगरच्या संडे क्लब व देशपांडे परिवाराच्या वतीने दिला जाणारा श्याम देशपांडे ग्रंथसखा पुरस्काराने दि.०३ ऑगस्ट रविवार रोजी नंदिनी चपळगावकर,डॉ. राजशेखर बालेकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. जोंधळे यांनीअनुराग पुस्तकालयाच्या वाचक चळवळ वीस वर्षे व पुस्तक पेटी उपक्रम दहा वर्षे चालविले असून त्यांनी अनुराग पुस्तकालय अंबाजोगाईत सुरू केले काम विस्तारत गेले या उपक्रमांची नोंद घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. श्याम देशपांडे व देशपांडे परिवाराच्या नावे दिला जाणारा हा पुरस्कार माझ्यासाठी खूप मोलाचा आहे.पुस्तक मुलांच्या हाती हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी मैत्री गट, विद्यालय,शिक्षक व विद्यार्थी अर्थिक सहकार्य करणारे अशा सर्व ''टीम वर्कचा'' हा सन्मान आहे असल्याचे जोंधळे यांनी सांगितले. त्यांना प्राप्त झालेल्या पुरस्कारा बद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गंगाखेड ते परळी शिव कावड यात्रा दिंडी परळी वैजनाथ नगरीत दाखल

परळी । प्रतिनिधी

श्रावण महिन्यात पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी गंगाखेड ते परळी भव्य दिव्य शिव कावड यात्रा दिंडी निघाली. परळी शहरातील गायत्री कावड़ परिवाराच्या वतीने आयोजित केलेली महादेवाची शिव कावड यात्रा, रविवार, ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी वैद्यनाथ नगरीत दाखल झाली.

पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैजनाथ भगवान येथे जल अर्पित करण्यासाठी परळी येथून पहाटे ४ वाजता ज्योतिर्लिंग परळी वैध्यनाथ येथून प्रस्थान करत गंगाखेड ते परळी माँ गोदावरी चे जल घेऊन निघाले असता यात १२० भाविकांचा सहभाग असलेली महादेवाची कावड यात्रा दिंडी रविवारी सायंकाळी परळीत दाखल झाली. हर हर महादेव, जय भोले, वैजनाथ भगवान की जय असा जय हो उपस्थित भाविकांनी दिल्याने वातावरण भक्तीमय झाले होते. या यात्रेला ढोल ताशांच्या गजरात भजन गाने आणि शेकडो भाविकांच्या उत्साही उपस्थितीत एक विशेष धुमधडाका पाहायला मिळाला. यात्रेच्या स्वागतासाठी परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती, ज्यामुळे यात्रा पारंपरिक धार्मिक उत्सवात रूपांतरित झाली. भाविकांच्या धार्मिक उत्साहात आणि कावड यात्रेतील आध्यात्मिक उंचीने वातावरण पुर्णपणे पवित्र झाले.



## शिव कावड यात्रेचे आठवे वर्ष

**परळी शहरातील गायत्री कावड़ पंडित उत्तमजी शास्त्री (शर्मा) यांनी गेल्या ७ वर्ष पासून छोट्या प्रमाणात परळी नगरीतून राहणारे मोजके मित्र व कांहीं नातेवाईक घेऊन हि शिवकावड पदयात्रा परळी ते खड्का असे विविध गावी ठिकानाहून गंगा चे जल आनत कावड़ यात्रा काढली प्रति वर्षि पदयात्रा काढत असताना परिसरातील व नातेवाईक पदयात्रेत जोडत गेली आमच्या सोबत त्यांची पण या शिव कावड पदयात्रेत श्रद्धा वाढत गेली पाहता पाहता या शिव कावड़ ला अनेक वर्ष लोटत गेली आणि ही संख्या आता पटीने वाढत शेकड़ो भक्त जुडत गेले या यात्रेचे ०८ वे वर्ष आहे.**

# माजी सैनिक शेख मन्सुरभाई यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील माजी सैनिक शेख मन्सुरभाई (वय ६७) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी पहाटे निधन झाले. अतिशय शिस्तप्रिय, मनमिळावु व्यक्तीमत्व होते. भारतीय सैन्यात प्रदिर्घ सेवेनंतर त्यांनी आष्टी येथील हैद्राबाद बँकेत आणि आष्टीच्या ग्रामिण रुग्णालयात अनेक वर्षे सुरक्षा रक्षक म्हणुन काम केले होते.त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे आष्टी तालुक्यात व इतरत्र त्यांचा मोठा मित्र परिवार होता.गेल्या काही दिवसांपासुन मधुमेहामुळे त्यांना त्रास होत असल्याने नगरच्या साईदिप हॉस्पिटलमध्ये त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती.



उपचारादरम्यान शुक्रवारी पहाटे त्यांचे निधन झाले. त्यांचा दफनविधी धामणगांव येथील कब्रस्थानमध्ये शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता करण्यात आला. यावेळी त्रिदलच्या माजी सैनिक मित्रपरिवाराच्या वतीने त्यांना सलामी देत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या पश्चात दोन मुली, जावई, नातवंडे, दोन भाऊ असा परिवार आहे. पत्रकार सय्यद बबलुभाई यांचे ते सासरे होते. त्यांच्या अंत्यविधीप्रसंगी विवीध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

# वृक्षारोपणाचा लाखो रुपयांचा निधी वृक्षतोडीमुळे पाण्यात

आष्टी । प्रतिनिधी

**वृक्ष वाढते कणभर, कत्तल होते मनभर अशी परिस्थिती असल्याने निसर्ग धोक्यात आला आहे. तरीही वनविभाग आपली जबाबदारी विसरून वृक्ष तोडीला दाद देत आहे. आष्टी तालुक्यातील अनाधिकृत आरा गिरण्यांना अभय दिले जात आहे.**



## वनक्षेत्र विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

शहरासह तालुक्यात अनेक आरा गिरण्यांमध्ये बेकायदा लाकडांचा साठा लोकांच्या नजरेत पडतो. पण तक्रार करण्यास कुणीच पुढे येत नसल्याने वनविभागाचे अधिकारी वृक्षतोड करण्याऱ्यांकडून चिरी मिरी घेऊन वृक्षतोड करण्यास एकप्रकारे मुकसंमती देत असल्याचे तक्रारी आहेत. विनापरवाना वखारींमुळे परवाना धारक वखार चालक जेरीस आले आहेत. सर्व नियमांचे पालन करूनही अधिकारी आमच्यावर कारवाई करत असल्याने सरकारने आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी परवाना वखार चालकांनकडून होत आहे. सरकारचे सर्व नियम धाब्यावर बसवून विनापरवाना वखारी चालविणा-यांवर

आष्टीत १९ आरा गिरण्या

आष्टी शहरासह तालुक्यात नोंदणीकृत तेरा व अनाधिकृत सहा अशा एकूण एकोणवीस आरा गिरण्या आहेत. तसेच मध्यंतरी वनविभागाकडून कारवाई होऊन सील करण्यात आलेल्या काही आरा गिरण्या आता पूर्ववत सुरु झाल्याची होत आहे. वनविभाग व वीज कंपनीचे अधिकारी यांच्या मुकसंमतीने तालुक्यात विना परवाना चालणा-या वखारींच्या संख्येत वाढ झाली असून पर्यावरणास धोका निर्माण होत आहे.अधिकारी कोणतीच कारवाई करीत नसल्याचा आरोपही परवानाधारक वखार चालकांनकडून होत आहे. झाडे लावण्यासाठी व जगविण्यासाठी शासनाकडून लाखो रुपय खर्चुन जनजागृती होत आहे. मात्र वृक्षलागवडी ऐवजी वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने पर्यावरणास धोका निर्माण होत आहे. याबाबत प्रभारी वनविभाग अधिकारी तागड यांच्याशी संपर्क न झाल्याने बाजू कळू शकली नाही. वनविभागाच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे तसेच परवानगी नसलेल्या काही देखील सुरू आहेत.

# महात्मा फुले चौकाच्या फलकाची विटंबना : समाजकंटकांवर कारवाई करा-अ‍ॅड.राऊत

बीड । प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील राशीन येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाच्या फलकाची तोडफोड करून विटंबना करणाऱ्या जातीयवादी समाजकंटकांना तात्काळ अटक करावी अशी मागणी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अ‍ॅड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना निवेदन सादर करण्यात आले असून अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असलेल्या राशीन येथील चौकाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचे नामकरण सन २०१४ मध्ये ग्रामसभेच्या ठरावाने देण्यात आले होते. महात्मा फुले यांना मानणाऱ्या समाज बांधवांनी या ठिकाणी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौकाचा फलक उभारला होता. परंतु दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी काही समाजकंटकांनी या फलकाची तोडफोड करून विटंबना केली आहे. या समाजकंटकांवर तात्काळ कार्यवाही करून अटक करण्यात यावी अन्यथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अ‍ॅड. सुभाष राऊत, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक अ‍ॅड. संदीप बेदरे, तालुका अध्यक्ष सावता काळे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, नाभिक समाजाचे युवा नेते अजिंक्य सुरवसे, वडार समाजाचे शरद विटकर, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, महेश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य अजय राऊत, निलेश राऊत, कृष्णा राऊत, महादेव शिंदे, गोपाल सातपुते, यांच्यासह समता सैनिक व महात्मा फुले प्रेमी नागरिक उपस्थित होते.



# कलाशाखेसाठी पूर्वीप्रमाणे प्रक्रिया राबवा-आंधळे

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५ २६ पासून अकरावी कला विज्ञान व वाणिज्य शाखेसाठी शिक्षण विभागा कडून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली असून यामध्ये विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा जास्त आहे कला शाखेसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश ऑनलाईन घेण्यास अडचणी येत आहेत त्यामुळे अकरावीच्या कला शाखेसाठी पूर्वीप्रमाणे प्रक्रिया राबविण्यात यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे सर यांनी केली आहे जे कनिष्ठ महाविद्यालय पाहिजे ते मिळत नाही कला शाखेचा तुकडीचा विचार केला तर प्रवेश खूपच कमी प्रमाणात झालेले आहेत एक तर विद्यार्थी कला शाखेत प्रवेश घेण्यास जास्त इच्छुक नसतो कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकाकडून विद्यार्थ्याला प्रवेश घेण्यास प्रवृत्त केले तरी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश होणे शक्य नाहीत. तरी ग्रामीण भागात ज्या ठिकाणी स्थानिक चे विद्यार्थी आहेत त्या ठिकाणीच विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत प्राधान्य देण्यात यावे व ग्रामीण युवक संघटनेच्या मागणीचा विचार करावा असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे



## जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १२/२०२५
कालिदास पि.सुरेशराव पाटील विरुध्द ग्रा.पं. कार्या. नेकनूर
पहा
१. कालिदास पि.सुरेशराव पाटील रा.नेकनूर ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत सुरेखा भ्र.सुरेशराव पाटील यांचा दिनांक-२५/०२/२०२३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०७/ २०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०८/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड.**

# निर्भिड अन् रोखठोक बोलणारा नेता भीमरावजी धोंडेसाहेब



देशात ७५ वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला जातो पण बेदरवाडी (आमटे/दरेकर वस्ती)सारख्या गावाला कधीच डांबरी रस्ता झाला नव्हता, पण २०१४ ला विधानसभेवर निवडून आल्यावर मी स्वत: सगळ्यात पहिले काम बेदरवाडी(आमटे/दरेकर वस्ती), काकडहिरा, खडकवाडी, रोहतवाडी तेडोमरी , देवीमंदिर सारख्या गावाला जोडणारे रस्ते पहिल्या टप्प्यात प्रथम प्राधान्य देऊन पालकमंत्री तथा ग्रामविकासमंत्री ना.पंकजाताई साहेब मुंडे यांच्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत समाविष्ट करून केले, अनेक गावांना शाळा खोल्या, ग्रामपंचायत इमारती, अंगणवाडी, स्मशान भूमी बांधकाम सह पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करण्यात यशस्वी लोकप्रतिनिधी,बडजाव व घमेंड पणा नसलेला, लोकहितासाठीसदैवतत्पर, दुष्काळ पडला प्रत्येक ठिकाणी छावणी असेल पाणी असेल, हजारो कोटी रुपये खर्च करून बॅरेज बांधले, नालेखोलीकरण केले पण कुठंही टक्का घेतला असा आरोपन झालेला साखरकारखाना शैक्षणिक बाबतीत जिल्ह्यात सर्वात मोठे जाळे असून सर्वसाधारण, विनम्रता सहनशीलता असलेला नेता

माझ्या बाबतीत तर पाटोदा तालुका रोजगार हमी योजना समिती अध्यक्षपदासाठी माझं नाव त्यांनी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताईसाहेब मुंडे यांच्याकडे सुचवलं.त्या वेळी अनेक नेत्यांनी धोंडे साहेबांकडे संपर्क करून विनंती केली की मला हे पद देऊ नये.पण साहेबांनी सगळयांचं मत ऐकून घेतलं आणि स्पष्ट सांगितलं.



''तुमचं दुसरं काही मागणं असेल तर मी तात्काळ मदत करेन,पण या निर्णयात बदल होणार नाही.'' ही त्यांची ठाम, निर्भीड आणि स्पष्टवक्ती नेत्याची ओळख होती.शिक्षण, सहकार आणि शेतकरीहितासाठी लढणाराअसा नेता विरळाच असतो.५ ऑगस्ट वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य आणि यश लाभो,हीच सदिच्छा व्यक्त करतो.

**-पांडुरंग नागरगोजे**
माजी लोकनियुक्त, सरपंच
रोहतवाडी तथा उपसभापती
कृषीउत्पन्न बाजार समिती पाटोदा
शिरूर

## जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३१३/२०२५
राजेंद्र लहु खंदारे विरुध्द ग्रा.पं. कार्या. कारेगव्हाण
पहा
१. राजेंद्र लहु खंदारे रा.कारेगव्हाण ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत गंगाराम जिजाबा खंदारे यांचा दिनांक-२४/१२/२०१६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३/०८/ २०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०९/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड.**

# बोगस रासायनिक खत विक्री, मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश

## कृषी विभागाची कारवाई; ११ लाखांचा साठा जप्त

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव परिसरात बोगस रासायनिक खत तयार करून शेतकऱ्यांना विक्री करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. कृषी विभागाच्या गुण नियंत्रण पथकाने पोलिसांसह कारवाई करत विठ्ठल खत कारखान्यावर छापा टाकून तब्बल ११ लाख १२ हजार रुपयांचे बनावट खत जप्त केले. यावेळी ७०० पोत्यांमध्ये हे खत साठवण्यात आलेले आढळून आले.

आकर्षक पॅकिंगमध्ये रासायनिक खताचे ७०० पोते

कृषी विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे महालक्ष्मी फर्टिलायझर एलएलपी या कंपनीच्या वतीने विठ्ठल खत कारखान्यात बनावट खत तयार केलं जात असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार गुण नियंत्रण अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कारखान्यावर छापा टाकला असता, विविध कंपन्यांच्या नावाने लेबल लावलेले आणि आकर्षक पॅकिंगमध्ये तयार करण्यात आलेले रासायनिक



खताचे ७०० पोते सापडले. जप्त केलेल्या खताचा अंदाजे बाजारमूल्य ११ लाख १२ हजार रुपये एवढा असून, ही संपूर्ण रक्कम बनावट खताच्या विक्रीतून कमवण्यात आली होती. शेतकऱ्यांची फसवणूक करण्याच्या या प्रकारामुळे कृषी विभागाकडून कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी पुणे जिल्ह्यातील थेरगाव येथील सुदीप सुरेश साळुंखे, अहमदनगर जिल्ह्यातील हंडी निमगाव येथील योगेश बाळकृष्ण जाधव आणि पंढरपूरजवळील विठ्ठल खत कारखान्याच्या संचालकांविरोधात पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपींविरोधात रासायनिक खत आदेश १९८५ मधील नियमांचे उल्लंघन, तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम २, ३ आणि ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सध्या याप्रकरणी अधिक तपास सुरू असून, आणखी काही आरोपींचा या रॅकेटशी संबंध आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.शेतकऱ्यांच्या श्रमांची लूट करणाऱ्या या बोगस खत विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. कृषी विभागाच्या या कारवाईमुळे बनावट खत विक्रेत्यांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे.

# पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्याचे व्यवस्थापन

पावसाळ्यात जनावरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणगरजेचे असते, कारण या काळात जनावरांना जंतूसंसर्ग किंवा पोषणा अभावी विविध प्रकारचे आजार होत असतात. वेळीच उपाय केल्यास होणारे नुकसान टाळता येते. यात प्रामुख्याने शेळ्या, मेंढ्याची निगा राखणे महत्त्वाचे ठरते.

पावसाळ्यातील शेळ्यांचे व्यवस्थापन : शरीरावरील परजीवींच्या वाढीकडे लक्ष द्यावे. नवीन करडांचे जंत निर्मूलन करावे. सर्व शेळ्यांचे आंत्रविषार, पी. पी. आर., धनुर्वातासाठी लसीकरण करून घ्यावे.

पैदासक्षम शेळ्यांना खुराक वाढवा. पैदाशीच्या बोकडांची पैदाशीसाठी तयारी करावी. जर एकावेळी शेळ्यांना गाभण घालायचे असेल तर माज ओळखण्यासाठी माज ओळखणारा बोकड गोठ्यात ठेवावा.

पावसाळ्यातील मेंढ्यांचे व्यवस्थापन : पशु वैद्यकाच्या सल्ल्याने कळपातील मेंढ्यांची लाल लघवीचा आजार व कावीळ या रोगाची तपासणी करून उपचार करावे. मेंढ्यांना शिफारसीनुसार जंताचे औषध उपचार करावेत. गाभण मेंढ्याची विशेष काळजी घ्यावी. १ ते १२ महिने वयाच्या कोकरांचे शारीरिक वजन करून घ्यावे. सर्व मेंढ्यांना धनुर्वात रोगाचे लसीकरण करून घ्यावे.

इतर जनावरांची काळजी : गोठ्यामध्ये काही ठिकाणी पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनियम मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे.पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते. दगड व माती खूरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खूरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो.

# अशी करा नवीन फळझाडांची रोपे, कलमांची निवड

सध्या नवीन फळझाडांची लागवड सुरू झाली आहे. साधारण सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांपर्यंत फळझाडांची लागवड सुरू असते. या लागवडीच्या हंगामाच्या फायदा घेण्यासाठी गावपातळीवर विविध फळपिकांच्या रोपे/कलमे विक्री करणाऱ्यांचा सुळसुळाट दिसून येतो. मोठ्या आकारांच्या पिशवीमध्ये मोठ्या वयाची आणि आकाराची विविध रोपे/कलमे ज्यांच्या वयाची आहेत, कोणता मातृवृक्ष आहे, कोणत्या पद्धतीने तयार केली आहेत याची शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. या विक्रेत्यांकडे विक्री परवाना नसतो तसेच विक्रीचा कोणताही ठरावीक दर ठरलेला नसतो. अशा विविध बाबींकडे दुर्लक्ष करून बरेच शेतकरी अशा प्रकारच्या ठिकाणाहून आपल्या शेतात लावण्यासाठी रोपे/कलमे विकत घेतात. अशी रोपे, कलमांच्या खरेदीमुळे पुढील टप्प्यांत नुकसान होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन नवीन रोपे/कलमे विकत घेताना विशेष काळजी घेणे आणि तांत्रिक माहिती असणे आवश्यक आहे.

रोपे/कलमे खरेदी करताना : जून ते ऑगस्ट महिन्यांपर्यंत फळपिकांच्या लागवडीची शिफारस आहे. चांगले दोन पाऊस म्हणजेच साधारण १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतर फळपिकांची लागवड करावी. योग्य आकाराचे लागवडीचे खड्डे, सूक्ष्म सिंचनाची व्यवस्था महत्त्वाची आहे. कृषी विभागाची जिल्हा तसेच तालुकास्तरावरील फळरोपवाटिका, कृषी विद्यापीठातील फळ रोपवाटिका, राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्रांमधील फळरोपवाटिका (लिंबूवर्गीय पिकासाठी नागपूर, द्राक्ष पिकासाठी पुणे, डाळिंब पिकासाठी सोलापूर), कृषी विज्ञान केंद्राची फळरोपवाटिका, एनएचबीकडून मान्यता प्राप्त फळरोपवाटिका आणि कृषी विभागाकडून मान्यता प्राप्त खासगी फळरोपवाटिकेतून रोपे, कलमांची खरेदी करावी. शासकीय तसेच शासनमान्य फळरोपवाटिकेतून रोपे, कलमांची निवड करावी. कृषी विभागाच्या



योजनांचा लाभ घेऊन फळपिकांची लागवड करणार असेल तर पूर्वसंमती मिळाल्यानंतर रोपे/कलमे खरेदी करावीत. ज्या फळपिकांची रोपे/कलमे आपण घेणार आहोत, त्या पिकांचे मातृवृक्ष रोपवाटिकाधारकाकडे असल्याची खात्री करावी. फळरोपवाटिकाधारकाकडे चालू वर्षीच्या रोपे/कलमे विक्रीची शासनाची परवानगी असल्याची खात्री करावी. रोपे/कलमे घेताना ते एक वर्ष वयापेक्षा लहान आणि दोन वर्षांपेक्षा अधिक जुने नसावेत, याची शहानिशा करावी, त्यासाठी रोपे/कलमे नोंदणी (स्टॉक) रजिस्टर तपासावे.

रापे, कलमांचा आकार : रोपे/कलमे १.५० फूट उंचीपेक्षा कमी आणि २.५ फूट उंचीपेक्षा जास्त नसावीत. कारण १.५ फूट उंचीपेक्षा कमी रोपे/कलमांची कडक होण्याची प्रक्रिया (हार्डनिंग) पूर्ण झालेली नसते. २.५ फुटांपेक्षा उंची रोपे/कलमांची मुळे पिशवीमध्ये गुंडाळलेली आणि वाढ खुंटलेली असण्याची शक्यता असते. जास्त उंच आणि जास्त वयाची रोपे/कलमे शेतात लावल्यानंतर जमिनीशी एकरूप होण्यास अडचणीची होतात.

रोगमुक्तीकडे द्या लक्ष : लिंबूवर्गीय फळपिके, द्राक्ष, डाळिंब,पपई अशा पिकांच्या रोपे/कलमांच्या माध्यमातून फळरोपवाटिकेतून विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता असते, त्यामुळे खरेदी करताना रोपे/कलमे तसेच मातृवृक्ष रोग आणि कीडमुक्त आहेत याची माहिती घ्यावी.

योग्य जातींची निवड : फळपिकांच्या शिफारशीत केलेल्या जातींची निवड करावी. रोपवाटिकेमधून पक्की पावती आवर्जून घ्यावी. पावतीमध्ये फळपिकांच्या नावासोबत जातीचा उल्लेख, दिनांक तसेच दरांची स्पष्ट नोंद तपासावी. ज्या ठिकाणी आपल्याला फळपिकाची लागवड करायची आहे त्या ठिकाणावरून जवळ असलेल्या किंवा एकाच हवामान विभागात असलेल्या रोपवाटिकेतून रोपे, कलमांची निवड करावी.

वातावरणात मिसळण्यासाठी विश्रांती द्या : रोपे/कलमे आपल्या शेतात आणल्यानंतर ती सावलीत ठेवावीत. दुपारच्या उन्हाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी. लागवडीपूर्वी रोपे/कलमांना आपल्या शेतातील वातावरणाशी जुळून घेण्यासाठी ८ ते १० दिवसांची विश्रांती द्यावी. रोपे/कलमांना यांना वातावरणाचा ताण बसलेला असेल किंवा रोपे/कलमे सुकल्यासारखी दिसत असतील तर त्यावर प्रति लिटर पाण्यात ३ ग्रॅम १९:१९:१९ या विद्राव्य खताची फवारणी करावी.

# मक्यातील वाढत्या तणाचा सोप्या पद्धतीने बंदोबस्त

राज्यातील बहुमतांशी भागात पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकरी आता आंतरमशागतीची कामे उरकत आहेत. मात्र, शेतकऱ्यांना मजूर टंचाईला सामोरे जावे लागते. त्यामुळे तण काढणीची कामे खोळंबत आहेत. राज्यात यंदा मक्याची लागवड वाढली आहे. मका पिकातील तण नियंत्रणासाठी दोन पध्दतींचा अवलंब शेतकरी करू शकतात. यात यांत्रिक आणि रासायनिक पध्दतींचा समावेश आहे. मका पिकातील तणाच्या व्यवस्थापनामध्ये यांत्रिक तसेच रासायनिक पद्धतीचा वापर केला जातो. यांत्रिक पद्धतीसाठी विविध यंत्रे आणि मनुष्यबळाची गरज असते. सध्याच्या घडीला शेतकऱ्यांना मजूर मिळणे अवघड होते. सोबत प्रत्येक शेतकऱ्यासाठी यंत्राची सोय करणे सोपे नसते त्यामुळे रासायनिक पद्धतीने तण नियंत्रणावर शेतकऱ्यांचा भर असतो.



ॲट्रॅझीन (५०% डब्ल्यू पी) : ४०० ते ६०० ग्रॅम ॲट्रॅझीन पिकाच्या उगवणीपूर्वी हेक्टरी ५०० ते ६०० लिटर पाण्यातून फवारावे. हे तणनाशक रुंद पानांच्या आणि गवतवर्गीय तणांसाठी उपयुक्त आहे. पेरणीनंतर २४ ते ४८ तासांत जमिनीत ओलावा असताना द्यावे. हे तणनाशक फवारल्यानंतर १० ते १२ दिवस पिकाला पाणी देऊ नये.

२,४-डी अमाईन सॉल्ट (५८ टक्के एस. एल.) : हे तणनाशक पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी शेतात फवारावे. त्यासाठी ३५० मि. ली. प्रति एकर प्रति ४०० लिट या प्रमाणाने त्याची फवारणी करावी. हे तणनाशक रुंद पानांच्या तणांसाठी जसे माठ, काटे, गोखरु, पुनर्नवा, दुधी, लव्हाळा, घोळ अशा तणांसाठी उपयोगी आहे.

टेम्बोट्रीऑन (३४.४ टक्के एस. सी.) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी हे तणनाशक फवारावे. फवारणीमध्ये एका एकरासाठी ११५ मिली तणनाशक पाण्यात मिसळावे. सावा, शिंपी, श्वेत पुनर्नवा या तणांसाठी या तणनाशकाचा वापर होतो.

टोपरामेझॉन(३३.६ टक्के एस. सी.) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी एक एकरसाठी ३० मिली टोपरामेझॉन १००-१२० लिटर पाण्यात मिसळून शेतात फवारावे. रुंद पानांच्या गाजर गवत, कुंजर, माठ, फुगा, रेशीमकाटा, बथुवा, कोंबडा (करडू), रान नाचणी, वाघनखी, सावा, गोंदवेल इत्यादी तणांच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे.

हॅलोसल्फ्युरॉन मिथाइल (७५ टक्के डब्ल्यू.जी) : पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी लव्हाळा तणाच्या व्यवस्थापनासाठी हॅलोसल्फ्युरॉन मिथाइलचा वापर करावा. ३६ ग्रॅम प्रति एकर या प्रमाणाने या तणनाशकाची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

मेसोट्रिऑन (२.२७ टक्के) अधिक ॲट्रॅझीन (२२.७ टक्के एससी) : हे संयुक्त तणनाशक पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी फवारावे. हे संयुक्त तणनाशक १४०० मिली प्रति एकरसाठी पाण्यात मिसळून फवारावे. रुंद पानांच्या श्वेत पुनर्नवा, लव्हाळा, सावा, वाघनखी, इत्यादी तणांच्या व्यवस्थापनासाठी त्याचा वापर करावा.

ट्रॉप्रामेझोन (१० टक्के) अधिक ॲट्रॅझीन्? (३० टक्के एससी) : हे संयुक्त तणनाशक एक एकरसाठी १००० मिली या प्रमाणाने पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांत फवारावे. रुंद पानांच्या गाजर गवत, माठ, कोंबडा, रान मेथी, रेशीमकाटा आणि वाघनखी या मक्यातील प्रमुख तणांवर त्याची फवारणी करावी.

तणनाशके फवारतांना घ्यावयाची काळजी : तणनाशक फवारणीपूर्वी त्यावरील माहिती व्यवस्थितपणे वाचून घ्यावी. जमीनीवर तणनाशकाची फवारणी करण्यापूर्वी मातीमध्ये ओलावा असल्याची खात्री करावी. तणनाशकाची फवारणी वारा शांत असताना करावी. वाऱ्याच्या उलट दिशेने फवारणी करु नये. फवारणी पंपासाठी शिफारशीनुसारच नोझलचा वापर करावा. तणनाशके पाण्यात मिसळताना लाकडी काठीचा वापर करावा. शिवाय फवारणी करताना तणनाशक तळाशी बसू नये म्हणून ढवळून घ्यावे किंवा पंप हलवून घेणे. फवारणी करताना काही खाऊ नये, धूम्रपान करणे, डोळे चोळणे टाळावे तणनाशकांच्या फवारणीसाठी स्वच्छ पाण्याचा वापर करावा, गढूळ पाणी वापरु नये. तणनाशक फवारणीसाठी साधारणत: स्वतंत्रपंप असावा. तणनाशक खरेदी करण्यापूर्वी ज्या पिकासाठी ते वापरणार आहात त्या पिकाचा लेबल क्लेम आहे याची खात्री करावी. तणनाशकाची हाताळणी काळजीपूर्वक करावी. हातमोजे, मास्क, गॉगल, गम बुट घालून फवारणीला सुरुवात करावी. तणनाशकाला खाद्यपदार्थ आणि लहान मुलांपासून दूर ठेवावे.शेतामध्ये तणनाशकाचे विघटन चांगल्या आणि जलद पद्धतीने होण्यासाठी पिकाला सेंद्रीय खते द्यावी. सेंद्रीय खते मातीतील तणनाशकांचे अंश धरुन ठेवतात, सोबत सूक्ष्मजीवांचे प्रमाणही वाढते जे तणनाशकाच्या विघटनाला उपयुक्त ठरते.




## महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

## थोडक्यात



### आणणाभाऊ साठे जयंती साजरी

परतुर । प्रतिनिधी

१ ऑगस्ट रोजी दैठणा (बु.) येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली, यावेळी दैठणा (बु.) येथील सर्व समाज बांधव तसेच गावातील इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी अण्णाभाऊ प्रेमी श्री शामराव नाना चव्हाण दत्ता भदर्गे, भागवत कवडे, ज्ञानेश्वर भोकरे, भीमराव मिसाळ, लिंबाजी दैठणकर, शिवाजी भदर्गे, सुखदेव घोडे, दत्ता घोडे, सोपान घोडे, गौतम भदर्गे, भोनजी घोडे, अशोक दैठणकर, लक्ष्मण बेरगुडे, गणेश कणसे, लहान आप्पा मखमले, विठ्ठल घोडे, किसन घोडे, राहुल भदर्गे, ज्ञानेश्वर घोडे, गजानन वखरे, रामप्रसाद मिसाळ, प्रल्हाद भदर्गे, आदी मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### संशयातून विवाहितेला संपवले तर एका तरुणाचा खून

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात दोन खुनाच्या घटना उघडकीस आल्या. पहिली घटना मंगुजळगाव येथे विवाहितेची पतीने संशयातून हत्या केल्यानंतर दुसरी घटना बोंधलापुरी गावात वाढदिवसा तरुणाची सार्वजनिक ठिकाणी निर्घृण हत्या करण्यात आली. घनसावंगी तालुक्यातील मुंगू जळगाव येथे २ ऑगस्ट रोजी पती कांता गुढेकर याने पत्नीवर अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून ती झोपेत असताना छातीत धारदार शस्त्राने वार करून तिचा खून केला. घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. मात्र घनसावंगी पोलीस पथकांनी व पोलिस निरीक्षक केतन राठोड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली. तर दुसरी घटना ३ ऑगस्ट रोजी संभाजी उंडे हे त्यांच्या वडिलासह मोटरसायकलवरून अबड गावाकडे जात असताना गावातला अर्जुन वाघमारे यांच्या घराजवळ माजी सरपंच गटातील पाच जणांनी त्यांना अडवले. त्यानंतर लोखंडी रॉड, चाकू व लाकडी काठ्यांनी जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. उपचारासाठी जालना येथील रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी सदरील व्यक्तीला मृत घोषित केले. याप्रकरणी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत संशयित आरोपी आत्माराम सुभाष मोरे, सचिन आत्माराम मोरे, सुशिल आत्माराम मोरे, विशाल दत्ता मोरे, अक्षय मानिक मोरे (सर्व रा. बोंधलापुरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेत फिर्यादीची पत्नी अंतिका उंडे यांनाही मारहाण करण्यात आली. या घटनेची गंभीर दखल घेऊन पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी, सपोनि खरात व पोउपनि पवार यांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास पोउपनि पवार करत आहेत.


**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत घनसांगवी**

npghansawangi@gmail.com

जा.क्र.२०२५/नपघ/जा.प्र./कावी- १५१३

PHno०२४८३-२७१७८७ दिनांक: ०४/०८/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. राजु रोहीदास पवार २. बाळु परमेश्वर राठोड रा. ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे कृष्णा विठ्ठल काळे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ३९८८ दि. २५/०७/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २१६३ दिनांक:-२८/०७/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. कृष्णा विठ्ठल काळे रा. ता.घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १६६४/२५ मधील क्षेत्र १०६.८७ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

:-पुर्व मिळकत क्रमांक २४

पश्चिम :- मिळकत क्रमांक २६

दक्षिण :- मिळकत क्रमांक २८

उत्तरेस :- रस्ता

या वरील चतुः सिमा मधील १०६.८७ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर / आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित

**मुख्याधिकारी**

नगरपंचायत घनसांवगी



**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६४**

**दिनांक -३१/०७/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शेख कडू भिक्कन रा. नांदी/ ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या नातु च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहम्मद अनिस सय्यद | नातू | १०/११/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-३१/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


# पिंपरनई येथील स्मशानभूमीची अवस्था मरणासन्न; निवारा नाही, पाण्यातुन वाट काढावी लागते





लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरनई येथील स्मशानभूमीची दुरावस्था झाली असुन १५ वर्षांपूर्वी बांधलेल्या बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असुन वादळी वाऱ्यासह पावसाने पत्रे उडुन गेल्याने पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी पाऊस थांबण्याची तसेच तलावाच्या शेजारी स्मशानभूमी असल्याने पावसाळ्यात पाण्यातुन वाट काढत अंत्यविधी करावा लागतो त्यामुळे प्रशासनाने नविन स्मशानभूमी बांधण्यासाठी लक्ष द्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनिल भोसले यांनी केली आहे.

बीड तालुक्यातील पिंपरनई गावची लोकसंख्या जवळपास २००० असुन गावात दलित सामाजाची ३५ घरे आहेत. गावची स्मशानभूमी गावतलावा शेजारी असल्याने व १५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेले पत्र्याचे शेड वादळी वाऱ्यासह पावसाने उडुन गेल्याने निवारा नाही. पावसाळ्यात तलावात पाणी साचल्याने पाण्यातुन वाट काढत अंत्यविधीसाठी जावे लागते. दोन वर्षांपूर्वी पावसाळ्यात पावसाची झड सुरूच राहिल्याने निवारा नसल्याने साहेबराव भोसले यांचा अंत्यविधी दुसऱ्या दिवशी करावा लागला. ज्यांना शेती आहे ते शेतात अंत्यविधी करतात परंतु भुमिहिन आणि गोरगरीब दलित समाजातील लोकांना अंत्यविधीसाठी मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. मात्र प्रशासकीय अधिकाऱ्यांना याचे गांभीर्य नसल्याची खंत सुनिल भोसले यांनी व्यक्त केली. बीड जिल्ह्यातील १३९४ गावापैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच उपलब्ध नाही तर काही गावांमध्ये स्मशानभूमीचे बांधकाम ढासळलेल्या व पत्रे उडाल्याने निवारा नसुन दुरावस्थेत आहे. मागासवर्गीय समाजातील व्यक्तींचा अंत्यविधी रोखल्याने शासकीय कार्यालयात मृतदेह आणुन ठेवल्याच्या घटना घडलेल्या आहेत यातुन सामाजिक ताणतणाव निर्माण होत असुन वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्यातील स्मशानभूमीची दुरुस्ती व नविन बांधकामासाठी जिल्हा नियोजन मधुन निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.आयुष्यभर जगण्यासाठी संघर्ष केल्यानंतर निदान मृत्युनंतरही मृतदेहाची विटंबना थांबविण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## गोरक्षनाथ टेकडी परिस आहे, सेवा करून जीवनाचे सोने करा -सांगळे महाराज

बीड । प्रतिनिधी

गोरक्षनाथ टेकडी हि गुरू शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे गोरक्षनाथांनी गुरू मच्छिंद्रनाथांची सेवा केली तशी गुरू किसन बाबा महाराज यांची सेवा सद्गुरू गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केली. गुरू शिष्य सेवेतून गोरक्षनाथ टेकडी हि पुनीत झाली आहे.

गोरक्षनाथ टेकडी हि परिस आहे येथे तुमच्या आयुष्याच सोन करायचं असेल तर तुम्ही गोरक्षनाथ टेकडी सेवा करा गुरू किसन बाबा महाराज, गुरू नवनाथ बाबा महाराज यांची सेवा करा नक्कीच तुमच्या जीवनच सोन झाल्याशिवाय राहणार नाही असे अभंग विवेचन करताना ह. भ. प. संत ज्ञानेश्वर महाराज सांगळे मुंबई यांनी विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन पुष्प समर्पित करताना व्यक्त केले. या कीर्तनात मृदुंगसाथ ह.भ.प.अरुण महाराज कदम व ह.भ.प.ऋषिकेश महाराज जाधव कीर्तनात कीर्तन साथ ह.भ.प.सुग्रीव महाराज डाके,ह.भ.प. भागवत महाराज नरवडे व ह.भ.प.भीमराज महाराज घुगे नाशिक यांनी दिली.श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, संगीत भजन, हरिजागर, भारुड असे भक्तिमय कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे दोन दिवसापासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत.



कर्जतः अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली यावेळी श्रद्धा काळुंके, रोहिनी काळुंके, रुपाली काळुंके, राज काळुंके, अभिषेक काळुंके ,विराट काळुंके ,सम्राट काळुंके या विद्यार्थ्यांनी लोक शाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या १०५ जयंती निमित्त मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ राहुल पाटील डोंगरे हे होते यांच्यासह सर्व गावकरी हे उपस्थित होते.

## आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून बीड ते गोरक्षनाथ टेकडी बस सेवा सुरू -डावकर



बीड। प्रतिनिधी

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे प्रतिवर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत ह. भ. प. किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेला सप्ताहास व श्रावण महिन्यात सोमवारी भावीक भक्तांची प्रचंड गर्दी होते. भाविकांच्या सोयीसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी राज्य परिवहन महामंडळाला बस सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाने गोलरक्षक टेकडी येथे बस सेवा सुरू केली असून त्याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन भाऊसाहेब डावकर यांनी केले आहे.

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी हे सर्व भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. श्रावण महिन्यात येथे भाविक भक्तांचा प्रचंड ओघ असतो, मात्र आजतागायत बस सेवा सुरू नव्हती. बस गोरक्षनाथ टेकडी फाट्यावर थांबत नव्हत्या आणि त्यामुळे सात आठ किलोमीटर लोकांना पायी चालत जावे लागत असे त्या अनुषंगाने भाऊसाहेब डावकर, सरपंच तेजाब चव्हाण, उत्तरेश्वर जाधव व परिसरातील नागरिकांनी आ. विजयसिंह पंडित यांची भेट घेऊन बस सेवा सुरु करण्याची मागणी केली. आ. पंडित यांनी तात्काळ त्याची दखल घेऊन राज्य परिवहन महामंडळाकडे लेखी पत्र दिले. एस.टी. महामंडळाने आ. विजयसिंह पंडित यांच्या पत्राची दखल घेऊन त्या ठिकाणी बस सेवा सुरू केली आहे. त्यामुळे भाविक भक्तांचा गोरक्षनाथ टेकडीला जाण्यायेण्याचा प्रश्न निकाली निघाला आहे. बास सेवा सुरु झाल्यामुळे गोरक्षनाथ टेकडीचे मठाधिपती शांतीब्रह्म ह. भ. प. नवनाथ बाबा महाराज, ओमतात्या खवतड यांच्यासह परिसरातील नागरिकांनी आ. विजयसिंह पंडित आणि एस. टी. महामंडळाचे आभार मानले आहेत. आज भाविक भक्तांनी त्या ठिकाणी उत्साहामध्ये महामंडळाच्या बसचे स्वागत करुन आनंद साजरा केला. यावेळी भाऊसाहेब डावकर, तेजाब चव्हाण, कैलास देवकते, भास्कर देवकते, सतीश देवकते यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाचनाशिवाय समाज प्रगती अशक्य-किरणकुमार खिल्लारे

बीड। प्रतिनिधी

महापुरुषांचे विचार, त्यांची आत्मचरित्रं आणि ग्रंथ हे आपल्याला प्रेरणा देतात, आपल्या कृतीला योग्य दिशा दाखवतात. आजचा तरुण जर मोबाईलऐवजी पुस्तक हातात घेत असेल, केवळ मनोरंजनाऐवजी विचारांचा स्वीकार करत असेल, तरच समाजाचा प्रगतीचा आलेख खऱ्या अर्थाने वर जाईल, असे प्रतिपादन उपलेखा अधिकारी किरणकुमार खिल्लारे यांनी केले. साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, दि.२ रोजी तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून ते मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य श्यामसुंदर वाघमारे, प्रा.शरद वंजारे, प्रा.राम गायकवाड,श्री.उत्तम पवार, डॉ.चंद्रकांत साळवे, श्री.एकनाथ मुजमुले, प्रा.अर्जुन राठोड आदी उपस्थित होते.

पुढे खिल्लारे यांनी, शिक्षण घेतल्यानंतर आपण केवळ स्वतःपुरता विचार न करता, समाजाच्या उन्नतीसाठीही काम केलं पाहिजे. अण्णाभाऊ साठे यांनी हेच करून दाखवलं अल्पशिक्षण असूनही त्यांनी आयुष्य शोषित-वंचितांच्या सेवेसाठी वाहिलं. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपणही समाजपरिवर्तनासाठी पुढाकार घेतला पाहिजे,असे त्यांनी आवर्जून सांगितले. प्राचार्य श्यामसुंदर वाघमारे यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठेंच्या 'माझी मैना गावाकडे राहिली' या प्रसिद्ध गीताचा



अर्थ सोप्या शब्दांत समजावून सांगितला. त्यांनी सांगितले की, हे गीत फक्त भावनिक गाणं नसून, महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात राहणाऱ्या मराठी माणसांच्या वेदनांना, त्यांचं दुःख आणि घरापासून दूर राहण्याची खंत यांना आवाज देणारं आहे, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्रा.प्रदीप रोडे यांनी महापुरुषांचे साहित्य आपल्या ग्रंथालयात उपलब्ध आहे, मात्र ते वाचून आपण काय शिकलो आणि त्याचा जीवनात कसा उपयोग केला, हे अधिक महत्त्वाचे आहे. जयंती साजरी करणं ही केवळ औपचारिकता न राहता, त्या महामानवांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची प्रेरणा ठरली पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानावर प्रकाश टाकला. प्रा.अंकुश कोरडे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले, तर प्रा. किशोर वाघमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या विशेष कार्यक्रमाला तुलसी शैक्षणिक समूहाच्या विविध युनिट्समधून आलेले सर्व प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले, प्रा.डी.जी. निकाळजे, सौ.उमा जगतकर, प्रा.बी.डी.राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुलसी समूहाच्या वतीने डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

### राज्यभरातून शालेय आणि महाविद्यालयीन स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

बीड । प्रतिनिधी

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा रविवार, ३ ऑगस्ट रोजी बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात उत्साहात पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा. रवींद्र जोगदंड यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे संपूर्ण जीवन संघर्ष, साहित्य आणि समाजकार्य यांचा समतोल दिसून येतो. केवळ ४९ वर्षांचे आयुष्य लाभूनही त्यांनी ८० ग्रंथांची निर्मिती केली, ज्यातून त्यांच्या विचारांची तीव्रता व लेखनशक्ती दिसून येते. त्यांच्या कार्याचे तीन मुख्य टप्पे म्हणजे कामगार चळवळ, समाज प्रबोधनात्मक साहित्यनिर्मिती आणि आंबेडकरी चळवळीत सक्रीय सहभाग



हे आजही मार्गदर्शक आहेत. विद्यार्थ्यांनी हे विचार आत्मसात करून कृतीत उतरवावेत, हाच या स्पर्धेचा खरा हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रो. डॉ. मनोहर सिरसाट, प्राचार्य राजकुमार कदम, माजी नगरसेवक उत्तम अंभोरे, माजी मुख्याध्यापक रामकिशन जोगदंड, प्रा. राम गायकवाड, प्रा. अर्जून राठोड, डॉ. सुनील जोंधळे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. राज्यभरातील शालेय (कनिष्ठ) आणि महाविद्यालयीन (वरिष्ठ) गटांतील एकूण १५४ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. प्रा. डॉ. पांडुरंग सुतार, प्रा. डॉ. चंद्रकांत साळवे, प्रा. शरद सदाफुले, प्रा. डॉ. नामदेव शिनगारे आणि प्रा. महादेव जगताप यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

भाषाशैली, सादरीकरण, विषयसमज आणि समारोप या निकषांवर विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात आले.या स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक मिथुन दत्तात्रय माने (लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा) यांना मिळाला. त्यांना ₹१०,००० रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय क्रमांक मुंडे ऋतुजा श्रीनिवास (कोल्हापूर), तर तृतीय क्रमांक मोहिनी चंद्रशेखर पायझम (माजलगाव) हिने पटकावला. त्यांना अनुक्रमे ₹७,००० व ₹५,०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक प्रणाली शहाजी धस (शिवछत्रपती विद्यामंदिर, बार्शी - सोलापूर) हिला मिळाला. तिला ₹७,०००, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. द्वितीय क्रमांक सोहनी आस्था शिरीष (बीड), तर तृतीय क्रमांक मुंगळे दिशा मनोज (लातूर) हिला मिळाला. त्यांना अनुक्रमे ५,००० व ३,००० चे रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले. दोन्ही गटांतील तीन-तीन विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ १,००० रोख व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. प्रा. प्रदीप रोडे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, देवगिरी प्रतिष्ठान गेली १६ वर्षे ही स्पर्धा सातत्याने आयोजित करत आहे. यामागचा हेतू केवळ स्पर्धा नव्हे, तर विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे विचार मांडावेत, वक्तृत्वाची कला आत्मसात करावी आणि त्यातून समाजप्रबोधनाची भावना रुजावी, हाच खरा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डी. जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे व प्रा. किशोर वाघमारे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ.विकास वाघमारे यांनी मानले. स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धक व शिक्षकांसाठी देवगिरी प्रतिष्ठानतर्फे अल्पोपहार व भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमास तुलसी समूहाच्या विविध युनिट्समधून आलेले प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएसआय कामठेचा माझ्या शरीराला विकृतपणे स्पर्श तरुणीच्या आरोपाने पुणे पोलीस अडचणीत ?

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरुड पोलीस ठाण्यात तीन दलित तरुणींवर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणाने पुणे पोलिसांच्या कार्यशैलीवर आणि दलित समाजावरील अन्यायावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

पीडित तरुणींनी आपल्या तक्रारीत कोथरुड पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक प्रेमा कामठे, कॉन्स्टेबल संजीवनी शिंदे, सायबर पोलीस सानप आणि एका पिवळ्या चेक शर्टातील अज्ञात पोलीस कर्मचाऱ्यावर गंभीर आरोप केले आहेत.

या तरुणींना छत्रपती संभाजीनगर येथील एका विवाहित महिलेच्या बेपत्ता प्रकरणाच्या तपासासाठी कोथरुड पोलीस ठाण्यात आणले



होते, जिथे त्यांचा सुमारे चार तास छळ झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणाने सामाजिक आणि राजकीय स्तरावर खळबळ उडवली असून, पोलिसांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. या प्रकरणातील पीडित तरुणी कोथरुड येथील एका फ्लॅटमध्ये राहत होत्या. त्यांनी आपल्या एका विवाहित मैत्रिणीला आश्रय दिला होता. ३ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजता कोथरुड पोलिस आणि छत्रपती संभाजीनगरचे पोलीस, तसेच त्या मैत्रिणीचे निवृत्त पोलीस असलेले सासरे, त्यांच्या फ्लॅटवर आले. त्यांनी फ्लॅटची झाडाझडती घेतली आणि दोन तरुणींना कोणत्याही लेखी नोटिशीविना कोथरुड पोलीस ठाण्यात नेले. तिथे त्यांना सायंकाळी ७:३० वाजेपर्यंत ठाण्याच्या वरच्या मजल्यावरील एका खोलीत डांबून ठेवण्यात आले.

दरम्यान, पीडित तरुणींनी तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. कॉन्स्टेबल संजीवनी शिंदे यांनी तू महार-मांगाची आहेस, रांड आहेस, किती मुलांसोबत झोपलीस? अशा जातीवाचक आणि अपमानास्पद शिवीगाळ केल्या. पोलिसांनी तरुणींची जात वारंवार विचारली आणि नाव सांगितल्यावर हसून त्यांचा अपमान केला. तसेच कॉन्स्टेबल शिंदे यांनी तरुणींच्या वैयक्तिक आयुष्यावर टिप्पणी केली. एकट्या राहता, मोकाट सुटलाय, किती पोरांसोबत झोपते?, तुझी आणि तुझ्या मैत्रिणीची ओढणी एकाच रंगाची आहे, तुम्ही लेस्बियन दिसता, अशा टिप्पण्यांनी तरुणींचा शाब्दिक लैंगिक छळ केला. तरुणींना गालावर, पाठीवर गुद्दे आणि चापट्या मारल्या, तसेच कमरेत आणि पायावर लाथा मारल्या.

पीएसआय प्रेमा कामठे यांनी एका तरुणीच्या शरीराला विकृतपणे स्पर्श केला. तक्रारीत म्हटले आहे की, पीएसआय कामठे माझ्या अंगावर आल्या, त्यांच्या हातांचा, खांद्याचा, हनुवटीचा घाणेरडा आणि विकृत स्पर्श मला जाणवला. पुरुष पोलिसांनीही तरुणींच्या शरीराला डोळ्यांनी स्कॅन केल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी तरुणींच्या मोबाइलमधील खाजगी चॅट, व्हॉईस नोट्स आणि फोटो तपासले. मस्त मजा करते, ऐष करते अशा टिप्पण्या करत त्यांनी तरुणींच्या वैयक्तिक आयुष्याचा अपमान केला. या दोघांमधला तुझा बॉयफ्रेंड कोण? असे प्रश्न विचारून मानसिक छळ केला. तरुणींनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मात्र, कोथरुड पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास नकार देत सात पानी पत्र दिले, ज्यामध्ये ही घटना सार्वजनिक ठिकाणी घडली नसल्याने ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊ शकत नाही असे नमूद केले.

## आयटीआयमध्ये दोन नवे अभ्यासक्रम सुरु होणार



**पुणे । प्रतिनिधी**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक), ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेइकल) हे नवीन अभ्यासक्रम सुरु केले आहेत.पर्यावरण संवर्धनावर आधारित योजना राबविण्यावर राज्य शासनाचा भर आहे. सौर ऊर्जाशी निगडित तंत्रज्ञानांची तसेच सोलर टेक्निशियन, मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेइकलची मागणी भविष्यात वाढणार आहे. त्यामुळे दोन नवीन अभ्यासक्रमांची मागणी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाने केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाकडे केली होती.

७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहेत. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या सुचनेनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थांत काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थां नवीन अभ्यासक्रमांची मागणी करतील तेथे मंजुरी दिली जाईल असे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाने स्पष्ट केले आहे.

## रांजणगाव गणपती येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस कृती आराखडा आणि महसूल विभागाच्या निर्देशानुसार महसूल सप्ताह २०२५ अंतर्गत रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन तहसिलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडले.या शिबिरात जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत खातेदारांच्या वारस नोंदी करून सातबारा आणि फेरफार दुरुस्ती करण्यात आली. याशिवाय, उत्पन्न, जात, रहिवासी, अल्पभूधारक, बिनविरोध आदी दाखले मान्यवरांच्या हस्ते खातेदारांना प्रदान करण्यात



आले. सामाजिक आर्थिक सहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्यात आले, ज्यामुळे शेतकऱ्यांना योजनांचा थेट लाभ मिळण्यास मदत झाली. शिबिरात महसूल विभागासह कृषी, पंचायत समिती, भूमी अभिलेख, आरोग्य, सेतू नागरी सुविधा केंद्र, सामाजिक वनिकरण, पशुवैद्यकीय, पाटबंधारे, महिला व बालकल्याण, वन आणि महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. प्रलंबित फेरफार प्रकरणे जलदगतीने निकाली काढणे, खातेदारांना त्वरित सेवा पुरवणे आणि शासकीय योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवणे, हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता.

## शिरूरचे नायब तहसिलदार प्रकाश मुसळे यांना 'उत्कृष्ट अधिकारी' पुरस्कार



***शिरूर । प्रतिनिधी***

शिरूर तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार प्रकाश मुसळे यांना पुणे जिल्ह्यातील महसूल प्रशासनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'उत्कृष्ट अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महसूल दिनानिमित्त पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान झाला. पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून निवडलेल्या अधिकाऱ्यांमध्ये मुसळे यांचा समावेश होता.

प्रकाश मुसळे यांनी शेतकरी समस्या, आपत्ती व्यवस्थापन, जमीन नोंदणी, वारस दाखले आणि महसूल नोंदींचे डिजिटायझेशन यासारख्या क्षेत्रांत पारदर्शक आणि नागरिकाभिमुख कार्यप्रणाली राबवली. त्यांच्या सौजन्यपूर्ण व्यवहारामुळे आणि वेळेवर सेवेमुळे ते नागरिकांमध्ये लोकप्रिय आहेत. पुरस्कार स्वीकारताना मुसळे म्हणाले, हा सन्मान माझ्या सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे मिळाला. जनतेचा विश्वास हेच माझे बळ आहे. भविष्यातही प्रामाणिकपणे सेवा सुरू ठेवेन. या पुरस्कारामुळे शिरूरच्या प्रशासनाचा दर्जा उंचावला असून, मुसळे यांच्यावर शासकीय आणि सामाजिक क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाने शिरूर तालुक्याचा गौरव वाढला आहे.

## श्रीरामपूर कोर्टात वकिलावर हल्ला; राजगुरुनगरमध्ये वकिलांचा संतप्त मोर्चा

**पुणे । प्रतिनिधी**

राजगुरुनगर श्रीरामपूर येथील न्यायालयात युक्तिवाद सुरू असतानाच वकिलावर हल्ला केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या निषेधार्थ राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील वकिलांनी खेड उपविभागीय अधिकारी, खेड तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढत आरोपीला कठोर शिक्षा करावी अशी मागणी करत निवेदन देण्यात आले.

बुधवारी (दि. ३०) श्रीरामपूर न्यायालयात ड दिलीप दत्तात्रय औताडे (वय ४४) यांच्यावर सुनावणी दरम्यान न्यायाधीशांच्या समोर आरोपीने हल्ला केला होता.





या हल्ल्यात ते जखमी झाले आहेत. या संदर्भात श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, वकिलावर हल्ला केल्याच्या घटनेचा निषेध आणि आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा करावी, या मागणीसाठी राजगुरूनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील वकिलांनी खेड उपविभागीय अधिकारी, खेड तहसीलदार कार्यालयावर मोर्चा काढला. श्रीरामपुर घटनेबाबत वकिलांनी संतप्त भावना व्यक्त करत खेड उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे, खेड तहसीलदार प्रशांत बेडसे यांना निवेदन दिले. यावेळी वकील संरक्षण कायदा आणून त्याची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. या मोर्चा मोठ्या संख्येने वकील बांधव सहभागी झाले होते.

## माजी खासदार स्व.निवृत्तीशेठ शेरकर जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**ओझर । प्रतिनिधी**

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार स्व.निवृत्तीशेठ शेरकर यांच्या जयंती निमित्ताने जिल्हा व तालुका पातळीवरील वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मंगळवारी (ता. १२ ऑगस्ट) रोजी न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बुद्रुक (ता. जुन्नर) येथे केले असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष सत्यशिल शेरकर यांनी दिली. माजी खासदार निवृत्तीशेठ नामदेव शेरकर प्रतिष्ठान, सत्यशिल शेरकर कम्युनिटी सेंटर व न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बुद्रुक यांच्या वतीने या स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येतात.

तालुकास्तरीय लहान गट (इयत्ता ५वी ते ७वी), मोठा गट (इयत्ता ८वी ते १०वी) व जिल्हास्तरीय उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन गट अशा तीन गटात ह्या स्पर्धा होणार असून स्पर्धेतील प्रथम तीन स्पर्धक व उत्तेजनार्थ रोख बक्षीसे, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

तालुकास्तरीय स्पर्धेसाठीचे विषय :

लहान गट - १. जुन्नर तालुक्यातील देवमाणूस स्व. निवृत्तीशेठ शेरकर २. वृक्षसंवर्धन काळाची गरज ३. माझी मायबोली माझी मराठी





४. हरवत चाललं गावचं गावपण ५. मला पडलेले एक रम्य स्वप्न ६. माझ्या स्वप्नातील भारत.

मोठागट - १. सहकारातील महामेरु स्व. निवृत्तीशेठ शेरकर २. स्त्री जन्मा तुझी ही कहाणी ३. आजच्या युवा पिढी पुढील आव्हाने ४. प्रसार माध्यमांची सामाजिक भूमिका ५. जगणं महाग होत आहे ६. शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असावी काय.?

तालुकास्तरीय बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना प्रत्येक गटासाठी देण्यात येणारे बक्षीस पुढीलप्रमाणे - १. प्रथम क्रमांकास रु. २५०१/- स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र २. व्दितीय क्रमांकास रु. २००१/- स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र ३. तृतीय क्रमांकास रु. १५०१/- स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र ४. उत्तेजनार्थ क्रमांकास रु. १००१/- स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठीचे विषय- १. सहकारमहर्षी स्व. निवृत्तीशेठ शेरकर २. राष्ट्राच्या जडणघडणीत युवकांचे स्थान ३. गर्दीत माणसांच्या माणूस शोधतो मी ४. जागतिक महासत्तेच्या उंबरठ्यावरील भारत ५. जागर स्त्री मुक्तीचा सन्मान स्त्री शक्तीचा ६. माध्यमांचे राजकारण लोकशाहीपुढील आव्हान.

जिल्हास्तरीय बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना देण्यात येणारे बक्षीस पुढीलप्रमाणे- १. प्रथम क्रमांक- रु. ७००१/-, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र २. व्दितीय क्रमांक रु. ५००१/-, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र ३. तृतीयक्रमांक - रु. ३००१/-, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र. ४. उत्तेजनार्थ - रु. २००१/-, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र.


अधिक माहिती व नावनोंदणीसाठी इच्छुक स्पर्धकांनी ता.११ ऑगस्ट पर्यंत व्ही.एम.डुंबरे ९८८११९१०७९ व आर.एस.अय्यर ९३२५५७१७६१ या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पबजी खेळायचा नाद अन् पिस्तुलचा खेळ अंगाशी आला, खरी बंदुकीची गोळी सुटली

**पुणे । प्रतिनिधी**

मोबाईलवर 'पब्जी ' खेळण्याच्या नाद आणि मित्रांसमोर स्टाईल मारण्याचा हव्यास एका तरुणाला चांगलाच अंगाशी आला. पबजी खेळता खेळता तरुणानं आपल्या जमलेल्या मित्रांना खरीखुरी पिस्तूल लोड करून दाखवली. पिस्तूल लोड अनलोड करताना अचानक सुटली गोळी आणि गोळीबारात ती मित्राच्या पायात घुसली अन तरुण गंभीर जखमी झालाय. हा धक्कादायक प्रकार पुण्यातील उत्तमनगर भागात रविवारी (३ ऑगस्ट) रात्री उशिरा घडलाय. या प्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी ५ जणांना ताब्यात घेतलंय.

उत्तमनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन खंदारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तमनगर परिसरातील एका इमारतीमध्ये राहणाऱ्या पाच मित्रांचा ग्रुप रात्री एकत्र जमून 'पबजी' हा मोबाईल गेम खेळत होता. याचवेळी यातील एक तरुण त्याच्याकडे



असलेलं पिस्तूल इतर मित्रांना दाखवू लागला. साधारण रात्री १.३० च्या सुमारास, त्याने ते पिस्तूल लोड आणि अनलोड करत असताना अचानक पिस्तुलातून गोळी सुटली. अत्यंत जवळ बसलेले असल्यामुळे ही गोळी थेट समोर बसलेल्या मित्राच्या पायाच्या नडगीतून आरपार गेली. गोळी लागलेला तरुण तातडीने जखमी झाला. गोळीबार झाल्याचं लक्षात आल्यानंतर या पाचही तरुणांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांना ही घटना कळू नये म्हणून त्यांनी बनाव करण्याचा निर्णय घेतला.

जखमी तरुणाने पोलिसांना फोन करून त्याच्यावर अनोळखी व्यक्तीने गोळीबार केल्याची खोटी माहिती दिली. मात्र, पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जेव्हा चौकशी सुरू केली तेव्हा त्यांच्या वागण्यात आणि उत्तरांत तफावत आढळली. संशय बळावल्यावर पोलिसांनी या तरुणांना खाक्या दाखवताच त्यांनी अखेर खरी घटना उघड केली.पोलिसांनी पिस्तूल जप्त केलं असून, ही शस्त्र कुठून आणली, याचा तपास सुरू आहे. या पाचही तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाणार आहे. गोळी लागलेला तरुण सध्या उपचार घेत असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा शहरात तरुणांमध्ये वाढत असलेला बेजबाबदार शस्त्रप्रेम आणि व्हिडीओ गेम्सचा प्रभाव उघड झाला आहे. फक्त खेळ म्हणून सुरुवात झालेल्या प्रसंगाचा शेवट रुग्णालयात झालाय.

# मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा !...त्याचे हात जोडण्यासाठी मित्रांचे शेकडो हात सरसावले

पुणे । प्रतिनिधी

दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा. कवी अनंत राऊत यांनी लिहिलेली ही कविता. पण तुम्ही म्हणाल ही कविता आता का? त्याला कारणही तसंच आहे. आपल्याला माहिती आहे रक्ताचीही नाती कधी कधी उपयोगी पडत नाही, मात्र तेच एका हाकेवर येणारे हे मित्र असतात. यासंदर्भात थेरगावच्या राहुलची घटना ऐकून.. तुम्हीही म्हणाल मित्रा जिंकलस !. गुजर नगर, थेरगावातील सामान्य कुटुंबातील राहुल कणगरे ऐन उमेदीतला तरुण. गेल्या महिन्यात काही समाज कंटकांनी कोयत्याने जीवघेणा हल्ला करत त्याच्या दोन्ही हाताचे पंजे छाटले. स्वप्नांनी भरलेला राहुल एका क्षणात निराशेच्या गर्तेत लोटला गेला. पण ही कहाणी फक्त दुखाची नाही, तर मित्रांच्या नि:स्वार्थ प्रेमाची, एकजुटीची आणि मानवतेची आहे, ज्याने राहुलला पुन्हा आयुष्याकडे आशेने पाहण्याची ताकद दिली. त्याचे दोन हात जोडण्यासाठी शेकडो हात त्याच्या मदतीसाठी सरसावले...

थेरगाव : राहुल (वय ३३) मेहनती आणि हसतमुख तरुण. तो आपल्या कुटुंबाचा आधार होता. त्याच्या आयुष्यातील हा प्रसंग त्याच्यासाठी, कुटुंबासाठी एक मोठा धक्का होता. दुर्दैवी हल्ल्याची बातमी कुटुंबासाठी आकाश कोसळल्यासारखी होती. राहुलच्या स्वप्नांचा, त्याच्या मेहनतीचा आणि त्याच्या आत्मविश्वासाचा आधारच नष्ट झाला होता. डॉक्टरांनी सांगितले की, प्रगत शस्त्रक्रियेद्वारे त्याचे हात पुन्हा जोडले जाऊ शकतात, पण त्यासाठी लागणारा खर्च लाखोंच्या घरात होता. हा खर्च राहुलच्या गरीब कुटुंबाच्या आवाक्याबाहेर होता.मित्रांना जेव्हा ही बातमी समजली, तेव्हा त्यांनी हार मानली नाही. मित्र विकास





## थेरगावच्या राहुलने मित्रांच्या साथीने घेतली नव्याने उभारी

असवले, योगेश राणवडे, नारायण वाघमोडे, रवी भिलारे, स्वप्निल कुंभार, आकाश हेगडे, हरी वाघमोडे आणि इतर काही जणांनी आधार देत एकजुटीची ताकद दाखवली. त्यात वंदे मातरम महिला मंडळा नेही पुढाकार घेतला. आपल्या मित्राला पुन्हा आयुष्य जगण्याची संधी मिळालीच पाहिजे या निश्चयातून मित्रांनी एक हात मदतीचा राहुल साठी हा व्हाट्सअप ग्रुप तयार केला शस्त्रक्रियेसाठी मदत गोळा करण्याची मोहिम उघडली. अवघ्या काही आठवड्यांत मित्रांनी मिळून शस्त्रक्रियेसाठी लागणारी साडे पाच लाख इतकी मोठी रक्कम जमा केली.

आता आधार देण्याची आमची वेळ

राहुल आमचा मित्र आहे, आमचा भाऊ आहे. त्याने नेहमी आम्हाला हसवले, आम्हाला साथ दिली. आता आमची वेळ आहे त्याला आधार देण्याची, असं राहुलचा मित्र विकास असवले याने झुंज न्यूजशी बोलताना सांगितले . मित्रांनी केवळ निधी गोळा केला नाही, तर राहुलच्या कुटुंबाला मानसिक आधारही दिला. त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली, मला वाटलं माझं आयुष्य संपलं. पण माझ्या मित्रांनी मला पुन्हा जगायला शिकवलं, राहुलने डोळ्यात पाणी आणत सांगितलं. त्याच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू उमटलं होतं.

### यशस्वी शस्त्रक्रिया ; नव्या आशेचा किरण

जमा झालेल्या निधीच्या आधारे राहुलवर पिंपरी तील एका नामांकित रुग्णालयात शस्त्रक्रिया झाली. डॉक्टरांनी अत्यंत कौशल्याने त्याचे दोन्ही हातांचे पंजे पुन्हा जोडले. ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि राहुल हळूहळू बरा होऊ लागला. शस्त्रक्रियेनंतर त्याला फिजिओथेरपी आणि पुनर्वसन प्रक्रियेतून जावे लागले, पण त्याच्या मित्रांनी त्याला कधीच एकटा सोडला नाही. ते नियमितपणे रुग्णालयात येत, त्याच्याशी गप्पा मारत, त्याला प्रोत्साहन देत.

### माणुसकी आणि एकजूट

ही कहाणी आहे थेरगावच्या राहुलची, ज्याला त्याच्या मित्रांनी आणि समजाने खऱ्या अर्थाने आधार दिला. ही कहाणी सांगते की, माणुसकी आणि एकजूट यांच्यासमोर कोणतीही अडचण मोठी नाही. राहुलच्या मित्रांनी दाखवून दिलं की, खरे मित्र केवळ हसण्यातच नव्हे, तर संकटातही खंबीरपणे साथ देतात. आणि या सगळ्यातून राहुलला मिळालं.. एक नवं आयुष्य, नव्या आशा आणि मित्रांच्या प्रेमाचा अखंड आधार!

### प्रतिक्रिया –

हा मैत्रीचा, माणुसकीचा विजय आहे. माझ्या मित्रांनी केवळ पैशाची मदत केली नाही, तर मला आयुष्याकडे नव्याने पाहण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या एकजुटीने आणि निस्वार्थ प्रेमाने मला पुन्हा स्वावलंबी बनण्याची संधी मिळाली. आज मी हळूहळू आपले हात पुन्हा वापरायला शिकत आहे. मी ठरवले आहे की, पुन्हा आपल्या कामाला सुरुवात करेल आणि मित्रांचे आणि समाजाचे हे ऋण कधीच विसरणार नाही.

– राहुल कणगरे, पीडित तरुण*ङ